रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २५० ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

## महिलांचा पिण्याच्या पाण्यासाठी आक्रोश



पान ३ वर

# कृषीवल

रायगड ॥ बुधवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## जिल्ह्यात ६९ रुग्ण; एकाचा मृत्यू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात मंगळवार, दि. १५ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या ६९ नव्या रुग्णांची नोंद झाली असून, उपचारादरम्यान एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. पाच तालुक्यांत एकाही नवीन रुग्णाची नोंद झालेली नाही. तर, दिवसभरात १६५ रुग्ण कोरोनामुक्त झाले, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. पनवेल महापालिका हद्दीत ३९, पनवेल ग्रामीण ४, खालापूर ३, उरण १, कर्जत २, पेण ७, अलिबाग ८, माणगाव २, रोहा १, श्रीवर्धन १, म्हसळा १ असे ६९ रुग्ण आढळले. मुरुड, सुधागड, तळा, महाड व पोलादपुरात एकही रुग्ण आढळला नाही.

### महत्त्वाचे

### राज्याचा अर्थसंकल्प ११ मार्चला

**मुंबई :** दि. ३ ते २५ मार्च या कालावधीत मुंबईत राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन होणार असून, ११ मार्च रोजी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. असा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याची माहिती संसदीय कामकाजमंत्री अनिल परब यांनी दिली. या बैठकीला सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (ऑनलाईन) उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते फडणवीस, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

### लालू पुन्हा तुरुंगात



**नवी दिल्ली :** चारा घोटाळ्याशी संबंधित २६ वर्षांपूर्वी दाखल केलेल्या फौजदारी खटल्यात सीबीआय विशेष न्यायालयाने मंगळवारी बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राजदचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांना दोषी ठरवून त्यांची रवानगी तुरुंगात केली आहे. डोरांड कोषागारातून १३९ कोटी अवैधरित्या काढल्याचा आरोप लालू प्रसाद यादव यांच्यावर आहे. लालूप्रसाद यांच्या शिक्षेकवर २१ तारखेला सुनावणी होणार आहे.

# मुंबईत ईडीची छापेमारी

## दाऊदसंबंधित व्यक्तींवर कारवाई

। मुंबई । वृत्तसंस्था ।

**कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याच्याशी संबंधित मालमत्तांच्या झालेल्या कराराप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) पथकांनी मंगळवारी सकाळपासून दक्षिण मुंबईतील १० ते १२ छापेमारी केली. इतकेच नाही तर, महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ राजकीय नेताही ईडीच्या रडारवर असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, एकूण सहा मालमत्तांची चौकशी सुरू आहे. या मालमत्तांचा संबंध काही राजकीय नेते, १९९३ बॉम्ब स्फोटातील आरोपी, हसिना पारकर यांच्याशी संबंध असल्याची माहिती समोर येत आहे. या धाडसत्रात एनआयएच्या टीमचीही तपासात मदत घेतली जात असल्याची माहिती समोर येत आहे.





अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याची संपत्ती आणि महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांमध्ये झालेल्या काही जागांच्या व्यवहारांबाबत हे धाडसत्र सुरू असल्याचं बोललं जात आहे. मात्र, या संदर्भात अद्याप कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. तसेच हा राजकीय नेता कुठल्या पक्षाचा आहे आणि कोण आहे, याबाबतही कुठलीही अधिकृत माहिती अद्याप मिळू शकलेली नाही.

ही व्यक्ती कोण आणि ईडीने नक्की कोणत्या मालमत्तांवर छापे टाकले आहेत, याचा उलगडा अद्याप होऊ शकलेला नाही. परंतु, कारवाईच्या फेऱ्यात आलेल्या व्यक्तीचे दाऊद इब्राहिम आणि दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगितले जाते.

*संपत्ती कराराबाबत ईडीने धाडी टाकल्या आहेत. अंडरवर्ल्डचा या करारामध्ये पैसा असल्याच्या संशयावरून ही कारवाई केली जात असल्याची चर्चा आहे. ईडी आणि एनआयएला ठोस पुरावे मिळाल्याने या धाडी टाकल्या जात आहेत. फक्त महाराष्ट्र आणि मुंबईच नाही, तर दिल्लीतूनदेखील तपास पथके मुंबई आल्याचे वृत्त आहे.*

## किरीट सोमय्या ईडीचा एजंट

। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार पाडण्याचा भाजपचा सातत्याने प्रयत्न सुरु असून, त्यात यश येत नसल्यामुळे ईडी आणि सीबीआय या केंद्रीय तपास यंत्रणांचा ससेमिरा महाविकास आघाडीतील नेत्यांच्या पाठीमागे हेतुतः लावला जात आहे.



राज्यातील भाजपचे काही नेतेच ईडीचे दलाल म्हणून काम करीत असून, किरीट सोमय्या यांचे पीएमसी बँक घोटाळ्याचा सूत्रधार राकेश वाधवान याच्याशी आर्थिक संबंध असल्याचा आरोप शिवसेना नेते पान २ वर

### कोणत्याही चौकशीस तयार



शिवसेना खा. संजय राऊत यांनी केलेल्या आरोपांना भाजप नेते किरीट सोमय्या ट्विट करीत यांनी, आतापर्यंत ठाकरे सरकारने माझ्याविरुद्ध १० खटले दाखल केले आहेत, मी आणखी एका प्रकरणाचं स्वागत करतो, आम्ही काहीही चुकीचं केलेलं नाही, पान २ वर

## धारदार शस्त्राने महिलेचा खून



। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील कोलाडपासून पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या मढाली (पुगाव) आदिवासी वाडीतील, ता. रोहा एका ३५ वर्षीय महिलेच्या मांडीवर, पोटावर, गळ्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करुन तिचा निर्दयपणे खून करण्यात आल्याची घटना घडली आहे.

या घटनेची तात्काळ दखल घेऊन कोलाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार उपनिरीक्षक ए.एल. घायवट यांनी पान २ वर

## अलिबागच्या शंतनुचे पुरुषोत्तम करंडकावर नाव

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

पुरुषोत्तम करंडक पटकावणाऱ्या अलिबागच्या शंतनु जोशी याचे आमदार जयंत पाटील यांनी अलिबाग शेतकरी भवन येथे बोलावून आवर्जून कौतुक केले.

यावर्षीचा अतिशय मानाचा समजला जाणारा पुरुषोत्तम करंडक बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय पुणे यांनी पटकावला. एकांकिकेचे नाव 'मंजम्मापुराणम्' असे होते. या एकांकिकेचे लेखन पान २ वर

### आ. जयंत पाटील यांच्याकडून कौतुक



## पटोलेंवर गुन्हा दाखल

। मुंबई । वृत्तसंस्था ।

काँग्रेसेनेते नाना पटोलेंविरोधात मुंबईतील समता नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पटोलेंनी काढलेल्या मोर्चात १८ वर्षांखालील मुलांनाही सहभागी करुन घेण्यात आले होते. या मुलांना पंतप्रधानांविषयी भडकविण्याचे काम पटोले करीत असल्याचा आरोप भाजप आ. अतुल भातखळकर यांनी केला असून, नाना पटोले यांना अटक करण्याची यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## भीषण अपघात चौघांचा मृत्यू

- मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील घटना
- सहा वाहने एकमेकांना धडकली
- मृतांमध्ये माजी मुख्यमंत्र्यांचे कार्यकर्ते



छायाचित्र : संतोषी म्हात्रे

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे-वर होणाऱ्या अपघातांचे सत्र काही थांबण्याचे नाव घेत नाही आहे. मंगळवारी पहाटे मुंबईच्या दिशेने येणारी सहा वाहने बोरघाटात एकमेकांना धडकली. या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून, आठ जण जखमी आहेत. त्यापैकी तिघांची परिस्थिती गंभीर असल्याचे समजत आहे. जखमींवर नवी मुंबईतील महात्मा गांधी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मृतांमधील तिघेजण सोलापूरचे असून, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे पान २ वर

### अन्यायग्रस्त अधिपरिचारिकांच्या न्याय्य हक्कासाठी

## बी.जी. पाटील यांचे उपोषण

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या अधिपरिचारिकांना नियमाप्रमाणे १८ महिन्यांची शासकीय नियुक्ती मिळावी या मागणीसाठी समाज क्रांती आघाडी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी.जी. पाटील यांनी मंगळवारपासून येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.



आरोग्य विभागातील संबंधित शासकीय व प्रशासकीय पदाधिकारी व अधिकारी यांच्या अन्यायी भूमिकेमुळे २०१७ मध्ये प्रशिक्षणास सुरूवात केलेल्या बंधपत्रीत अधिपरिचारिकांनी २०१९-२० मध्ये आपले प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून उत्तीर्ण होऊनसुद्धा नियमाप्रमाणे १८ महिन्यांच्या शासकीय नियुक्ती आदेशापासून त्या गेले दहा महिन्यांपासून वंचित आहेत. पान २ वर

### एबीजी शिपयार्डविरुद्ध

## लुकआऊट

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशातील सर्वात मोठा बँक घोटाळा समोर आल्याने खळबळ उडाली असताना सीबीआयने आता कारवाईचे पुढचे पाऊल उचलत एबीजी शिपयार्ड कंपनी तसेच संचालकांविरुद्ध लुकआऊट सर्क्युलर जारी केले आहे. तत्कालीन अध्यक्ष ऋषी अग्रवाल, संचालक संथानम मुथुस्वामी, अश्विनी कुमार व सुशीलकुमार अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## उद्यापासून वॉटर टॅक्सीसेवा

### मुंबई व नवी मुंबईकरांच्या सेवेस

घन:श्याम कडू

। उरण ।

बहुप्रतीक्षित वॉटर टॅक्सी येत्या १७ फेब्रुवारीपासून मुंबईकर आणि नवी मुंबईकरांच्या सेवेत दाखल होत आहे. केंद्रीय बंदर आणि जलवाहतूकमंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते वॉटर टॅक्सीचे उद्घाटन होणार आहे.

मुंबई पोर्ट ट्रस्ट, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड आणि सिडको यांच्या संयुक्त प्रकल्प असलेल्या या वॉटर टॅक्सीला जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी हिरवा पान २ वर

**तीन मार्गांवर चालतील टॅक्सी**

- फेरी वार्फ, माझगाव येथील क्रूझ टर्मिनल आणि बेलापूर टर्मिनल
- बेलापूर आणि एलिफंटा लेणी
- बेलापूर आणि जेएनपीटी

**असे असणार भाडे**

*डोमेस्टिक क्रूझ टर्मिनल ते बेलापूरमार्गे पुढे माझगाव येथील आंतरराष्ट्रीय क्रूझ टर्मिनल आणि एलिफंटापर्यंत जाण्यासाठी एका प्रवाशाला २९० रुपये आकारण्यात येतील, तर महिन्याच्या पासासाठी १२ हजार रुपये आकारण्यात येणार आहेत, अशी माहिती मेरिटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.*



**१५ मिनिटांत मुंबई**

*वॉटर टॅक्सीचा वापर वाढल्यास मुंबईकरांचा इंधनावर होणार खर्च, तसेच वाहतूक कोंडी, रेल्वेतील गर्दी आणि इतर बऱ्याच त्रासांपासून सुटका होणार आहे. मुंबई ते नवी मुंबई हा जलप्रवास वॉटर टॅक्सीने केल्यास तो अवघा १५-२० मिनिटांचा असेल. नवी मुंबईतून मुंबई शहरात कामधंदा आणि नोकरीसाठी दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या लाखांच्या घरात आहे.*

## युक्रेनमध्ये तणावपूर्ण स्थिती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

युक्रेनमध्ये सध्या प्रचंड अस्थिरतेची स्थिती असून, रशियाकडून युद्ध छेडलं जाण्याची दाट शक्यता असल्याचा दावा खुद्द युक्रेनकडूनच करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर युक्रेनमध्ये सध्या वास्तव्यास असलेल्या भारतीयांना सुरक्षेच्या कारणास्तव मायदेशी परतावे, असे आवाहने भारतीय दूतावासाने केले आहे. यासाठी दूतावासाने भारतीयांसाठी संदेशही जाहीर केला आहे.

या संदेशपत्रात दूतावासाने म्हटले की, सध्याची युक्रेनमधील अनिश्चिततेची स्थिती पाहता, इथे असलेल्या भारतीय नागरिकांनी विशेषतः ज्या विद्यार्थ्यांना इथे राहणे गरजेचे नाही, त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मायदेशी परतावे. त्याचबरोबर भारतीय नागरिकांना आवाहन करण्यात येतंय की युक्रेन अंतर्गत सर्व प्रकारचे अनावश्यक प्रवास त्यांनी टाळावेत. भारतीय नागरिकांना विनंती आहे की, त्यांनी युक्रेनमधील त्यांच्या वास्तव्याबाबत भारतीय दुतावासाला माहिती द्यावी. यामुळं दूतावासाला भारतीयांना सर्व प्रकारची आवश्यक ती सुविधा पुरवण्यात येईल, असेही या संदेशपत्रात लिहिले आहे.

**॥ भारतीयांना मायदेशी परतण्याचे आवाहन**







# आदिवासींचा पाणीप्रश्न कायमचा मिटणार

## महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्टचा पुढाकार

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात दऱ्याखोऱ्यात डोंगरावर वाड्या वस्त्यांमधून आदिवासी बांधव राहात असून, पिण्याच्या पाण्याकरिता या बांधवांना अनेक किलोमीटरची पायपीट करावी लागते. आदिवासी बांधवांची तहान भागविण्याकरिता पेण तालुक्यातील महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्टने पुढाकार घेतला आहे. या आदिवासी बांधवांना त्यांच्या वाड्या-वस्त्यांवर घरापर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.



हर घर नल, नल से जल देऊन पिण्याच्या व वापराच्या पाण्यासाठीची भटकंती थांबवून २०२४ पर्यंत देश टँकरमुक्तीसाठी जलजीवन मिशन राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे प्रत्येक कुटुंबास नळाद्वारे प्रती माणसी ५५ लीटर पाणीपुरवठा करण्याचे २०२४ पर्यंत केंद्राचे लक्ष आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ६१ गावात जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट रायगड या संस्था अंमलबजावणी सहाय्यक संस्था म्हणून कार्यरत आहे.

महाराष्ट्र शासन मुंबईकडून या संस्थेची आदिवासी भागातील कर्जत तालुक्यासाठी निवड करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील ६१ आदिवासी वाड्या-वस्त्या यांचा समावेश आहे. त्यानुसार जिल्हा परिषद रायगडचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता विभाग डॉ. ज्ञानदा फणसे, ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, गटविकास अधिकारी कर्जत चंद्रकांत साबळे, उप अभियंता एस.एन. इंगळे, जिल्हा समन्वयक आनंद धिवर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक जयवंत गायकवाड, महाराष्ट्र समाज विकास ट्रस्टचे अध्यक्ष मनोज गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली मेघा लोखंडे वरिष्ठ समाज शास्त्रज्ञ, स्थापत्य अभियंता म्हणून रितेश गुप्ता कार्यरत आहेत.

### ग्रामस्थांमध्ये जनजागृती

**जल जीवन मिशनच्या अंमलबजावणीसाठी संस्था ग्रामपंचायत व ग्रामसभेत ग्रामीण पाणीपुरवठा समिती स्थापन करून त्यांचे बँकेत खाते उघडणे, गावाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पिण्यासाठी व वापरासाठी लागणारे पाणी यांचे अंदाजपत्रक मांडून त्यास ग्रामसभेत मंजुरी देऊन लोकसहभागातून गावातील कामे करणे, शेवटच्या कुटुंबापर्यंत पाणीपुरवठा पोहोचवण्यासाठी कोपरा बैठका, गृहभेटीतून भरावी लागणारी पाणीपट्टी, लोकवर्गणी आदींबाबतीत जनजागृती, मार्गदर्शन वेळोवेळी क्षमता बांधणी प्रशिक्षण देण्यात येत आहे.**

## पान १ वरून

### किरीट सोमय्या ईडीचा एजंट

खा. संजय राऊत यांनी मंगळवारी शिवसेना भवनमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केला. महाविकास आघाडी सरकारच्या विरोधात कटकारस्थाने करणाऱ्या भाजप नेत्यांचा समाचार घेण्यासाठी शिवसेनेच्या वतीने ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी राऊत यांनी किरीट सोमय्या यांच्यासह अन्य भाजप नेत्यांवरही कडाडून शेलक्या भाषेत टीका केली. किरीट सोमय्या हा ईडीचा दलाल म्हणूनच काम करीत असून, त्याचे असणारे आर्थिक लागेबंध तपासले जावेत, अशी मागणीही त्यांनी केली.

बँक घोटाळ्यातून कंपनी

सोमय्या याचे पीएमसी बँक घोटाळ्याचा सूत्रधार राकेश वाधवान याच्याशी आर्थिक संबंध असून, या बँकेच्या घोटाळ्यातील पैसे सोमय्या याने आपल्या फायद्यासाठी वापरले आहेत. निकॉन इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी किरीट सोमय्यांची आहे. त्यांचा मुलगा नील कंपनीचा संचालक आहे. निकॉन कंपनीसाठी पीएमसी बँकेच्या घोटाळ्यातील पैसा वापरला असून, वसईमध्ये गोखीवरे तालुक्यात हजारो कोटींचा प्रकल्प उभा केला आहेफ असा गंभीर आरोप शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.

### कोणत्याही चौकशीस तयार

कोणत्याही भ्रष्टाचारात गुंतलेलो नाही असं म्हटलं आहे. तसेच पुन्हा एकदा उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांना टार्गेट करीत कोविड काळातील घोटाळ्यावर का बोलत नाहीत. सुजीत पाटकर आणि प्रवीण राऊत यांच्यावर का बोलत नाहीत, असा सवाल सोमय्या यांनी ट्विटच्या माध्यमातून विचारला आहे.

### भीषण अपघात चौघांचा मृत्यू

यांचे कार्यकर्ते असल्याची माहिती पुढे आली आहे.

एक्स्प्रेस-वेवर खोपोली एक्झीटजवळ मुंबईकडे जाताना एमएच-४६-एआर ३८७७ या कंटेनरचा ब्रेक फेल झाल्याने कंटेनरने पुढे जाणाऱ्या एमएच-१३-बीएन-७१२२ या स्वीफ्ट कारला धडक दिली. (यातील चार प्रवासी मयत). स्वीफ्ट कारने एमएच-१०-एडब्ल्यू-७६११ या पुढे जणाऱ्या आयशर टेम्पोला धडक दिली. टेम्पोने पुढे जाणाऱ्या एमएच-२१-बीओ-५२८१ या पुढील कारला जोरदार धडक दिली. (या कारमधील तीन प्रवासी, रा. जालना किरकोळ जखमी). वेन्यु कारने पुढे जाणाऱ्या कंटेनर एमएच-४६-बीएम-५२५४ जोरदार धडक दिली. मात्र, या अपघातानंतर कंटेनर चालक मात्र निघून गेला. या अपघातात स्वीफ्ट कारमधील गौरव गौतम खरात, सौरभ तुळसे, सिद्धार्थ मल्लीक राजगुरु, जि. सोलापूर व मयूर दयानंद कदम, रा. तुळजापूर हे जागीच ठार झाले, तर वेन्यू कारमधील प्रवासी पवन अग्रवाल, मितेश वडोदे, अस्लम शेख किरोळ जखमी झाले आहेत.

या अपघाताची माहिती मिळताच आयआरबी यत्रंणा, महामार्ग वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस, डेल्टा फोर्स घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरु केले. या अपघाताचा पुढील तपास खोपोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरेष कळसेकर करीत आहे.

### शंतनुचे पुरुषोत्तम करंडकावर नाव

व दिग्दर्शन शंतनू जोशी व योगेश सप्रे यांनी केले. तसेच प्रमुख भूमिका शंतनू जोशी यांनी साकारलेली होती. याच निमित्ताने आज दि.१५ फेब्रुवारी २०२२ रोजी शेतकरी भवन येथे शेतकरी कामगार पक्ष सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी शंतून जोशी यांचे विशेष कौतूक केले. अलिबाग येथील शंतनू जोशी याने पुरुषोत्तम करंडक या मानाच्या स्पर्धेत सहभागी होऊन अभिनयाचे पारितोषिक व प्रथम क्रमांकाच्या करंडकावर नाव कोरलेले आहे.

तसेच यानंतर पिंपरी चिंचवड येथे झालेल्या गडकरी करंडक या स्पर्धेत देखील अभिनयाचे पारितोषीक मिळविलेले आहे. अलिबाग आणि परिसरात पुरुषोत्तम करंडक मिळविण्याचा पहिला शंतनू जोशी यांनी पहिल्याच प्रयत्नात पटकावलेला आहे. पुरुषोत्तम करंडक ही महाराष्ट्रातील एक मानाची स्पर्धा आहे. या स्पर्धेतूनच आजच्या अनेक दिग्गज कलावंतांनी आपल्या कामगिरीची मुहूर्तमेढ रोवलेली आहे जसे की, अमेय वाघ, आलोक राजवाडे, निपूण धर्माधिकारी, मृण्मयी देशपांडे, अमृता सुभाष, प्रविण तरडे, क्षितिज दाते या कलाकारांची आजची कामगिरी हे या स्पर्धेचे यश आहे. यावेळी आ. जयंत पाटील यांच्यासमवेत ॲड. सचिन जोशी, संगीत दिग्दर्शक विक्रांत वार्डे, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर वाघमोडे व मिलिंद जोशी उपस्थित होते.

### उद्यापासून वॉटर टॅक्सीसेवा

झेंडा दाखवणार होते. परंतु, कोरोनामुळे उद्घाटन लांबले. आता मुंबई १०० टक्के निर्बंधमुक्तीच्या दिशेने वाटचाल करत असल्याने उद्घाटनाचा मुहूर्त ठरला आहे.

### बी.जी. पाटील यांचे उपोषण

मात्र, पुणे विभागातील त्याच बँचच्या अधिपरिचारिकांना १८ महिन्यांचे शासकीय नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. सन २०१६ मधील बँचच्या अधिपरिचारिकांनासुद्धा नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत. मात्र, २०१७ मधील १५ प्रशिक्षित अधिपरिचारिका बेरोजगारी व उपासमारीमुळे न्यायासाठी वणवण फिरत आहेत. त्यांना न्याय्य हक्क मिळून देण्यासाठी दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी पासून आपण जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे बेमुदत उपोषणास सुरू केले आहे, असे रायगड जिल्हा समाज क्रांती आघाडी संघटनेचे अध्यक्ष बी. जी. पाटील यांनी सांगितले. बी.जी. पाटील यांना संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परिचारिका आणि पालकांचाही पाठिंबा आहे.

### धारदार शस्त्राने महिलेचा खून

तीन पथके तयार करून सहा तासांच्या आत आरोपींच्या मुसक्या आवळल्या. याबाबत सविस्तर वृत्त असे की, मयत रेवती नितीन पवार (३५) १४ फेब्रुवारी रोजी शौचास जाते असे घरात आईला सांगून गेली होती. ती घरी आलीच नाही. त्यामुळे इतरत्र शोध घेतला असता सदर महिलेचे प्रेत मढाली गावच्या हद्दीत आढळले. पोलिसांना माहिती मिळताच अवघ्या सहा तासात आरोपी दिनेश भिवा जाधव (३८) रा. पुई आदिवासीवाडी, ता. रोहा याच्या मुसक्या आवळल्या.

## वाशीत शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**। खांब-रोहा । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील वाशी या गावी गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत याहीवर्षी शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, दि. १८ रोजी शिवज्योत आणण्यासाठी रायगडकडे प्रस्थान, तर दि. १९ रोजी पहाटे ४.३० वाजता किल्ले रायगड ते वाशी शिवज्योत यात्रेस प्रारंभ, सकाळी ११ वा. शिवज्योतीचे वाशी या गावी आगमन व शिवज्योतीचे पूजन व शिववंदना, तद्नंतर ११.३० वा. वाशी रंगमंचावर शिवज्योत विराजमान व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन व अभिषेक सोहळा, दु.३ ते ५ मशाल यात्रा, सायं. ५ ते ७ या वेळेत वाशी-लांढर-धाटाव पंचक्रोशी वारकरी संप्रदायाचे हरिपाठ व तद्नंतर जागृती खेरटकर यांचे शिवचरित्रपर कीर्तन होणार आहे.

## पत्रकारावर हल्ला

**। नेरळ । वार्ताहर ।**

पत्रकार अजय गायकवाड यांना १५ फेब्रुवारी रोजी राहत्या घराजवळ जाऊन मारहाण करण्यात आली. नेरळ ग्रा.पं.च्या सार्वजनिक शौचालय हटविण्यावरून आवाज उठविणारे अजय गायकवाड यांना मॉन्टी कदम यांनी मारहाण करीत जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१६ फेब्रुवारी**

१) श्रीम. अलका पंडित
एम.आयडीसीसमोर,अलिबाग
१६-०२-१९३९

२) श्रीम. नलिनी चव्हाण
मारुती नाका, अलिबाग
१६-०२-१९५४

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आम्ही आमचे अशिल अनमोल डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था यांचे मालकीच्या व महसुल दप्तरी नावे असलेल्या खालील वर्णनाची मौजे वांजळे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील बिनशेती जमिनीचे/मिळकतीचे मालकी हक्काचे (टायटल)बाबतचा तपास करीत आहोत.

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**

**मौजे- वांजळे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड**

| कब्जेदाराचे नाव | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|---|---|
| अनमोल डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री. राजेश मनीभाई पटेल | वर्ग १ | ४अ | १ | ४३-०६-० | ४३०-६० |
| | | ४अ | २ | ५-७५-० | ५७-५० |
| | वर्ग १ | ४अ | ३ | ०५-०७-० | ५०-७० |

तरी वर नमूद जमिनी/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विशद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून वर नमूद केलेल्या मिळकतीचे स्वामित्व/मालकी हक्क (टायटल) हे निर्वेध, स्वच्छ आणि बिनजोखमी आहे असे समजून सदर वर नमूद मिळकतीचा मालकी हक्काबाबत दाखल/टायटल रिपोर्ट माझे अशिलांना दिला जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- १५-०२-२०२२

सही/-
**ॲड. जे.डी.पाटील**
(बी.एस.एल.,एलएलबी.)
मुणोत रेसीडेन्सी, शॉप नं. ७ व ८, एच.ओ.सी.कॉलनीसमोर
जुना ठाणा नाका रोड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४१०२०६, मोबाईल नं. ९८२०७७१९४८


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
Email :- mahad.ee@mahapwd.com ph. No. (02145) 222167
**ऑफलाईन निविदा सूचना क्रमांक ९० सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत | इसारा बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत (पावसाळा धरुन) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| ७६७५४३ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा.६५ कि.मी. १६/३०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम) | ५२१९२०० | ५३००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५४४ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा.६५ कि.मी. १३/६५०मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम) | ५३७८६७६ | ५४००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५४५ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा.६५ कि.मी. १२/८००मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम) | ५७१६३६१ | ५८००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५४६ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा.६५ कि.मी. १०/४५०मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम) | ५५४५८५६ | ५६००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५४७ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा.६५ कि.मी. १३/०५०मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे तालुका महाड, जिल्हा रायगड (पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम) | ५०५४६९० | ५६००० | ११२०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५४३ | मौजे पारमाची बौध्दवाडी येथे साकव व रस्ता कॉक्रीटीकरण करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (वि.घ.यो) | ४८२४३०२ | ४९००० | ५६०/- | ६ महिने | वर्ग पाच व वरील |
| ७६७५५० | कोतवाल खु.रोहिदासवाडी, ता.पोलादपूर येथे पाईप साकव पक्का रस्ता तयार करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (वि.घ.यो) | २२६३३८४ | २३००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५५४ | कोतवाल खु.बौध्दवाडी येथे बौध्दवाडीकडे जाणारा रस्ता तयार करणे. पाईप साकव व संरक्षक भिंत पक्का रस्ता तयार करणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (वि.घ.यो) | २२६४४८७ | २३००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५५५ | खुटील बौध्दवाडी रस्त्यावर साकव व रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड.(वि.घ.यो) | २३०५३२४ | २४००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५५६ | मौजे किये ता.महाड खोताचीवाडी येथे सभामंडप बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड.(आ.स्था.वि) | १७१०५४८ | १८००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७६७५५८ | रूपवली सुभेंकोंड मधलीवाडी येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड.(डोंगरी) | १२७१३७४ | १३००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ७६७५६० | मौजे खरवली ग्रा.पं.खरवली शिंदे यांच्या घरापासून ते समर्थ नगर येथील रस्ता तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड.(डोंगरी) | १२८८९६२ | १३००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| ७६७५६१ | पांगळोली रोहिदास वाडी येथील लहान साकव व संरक्षक भिंत व रस्ता बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (वि.घ.यो) | १६५४४५० | १७००० | ५६०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा संच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. १५/०२/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दि. ०२/०२/२०२२ (१८.००) वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड,जिल्हा रायगड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि.०४/०३/२०२२ वेळ ११.०० पासून |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५७५
दिनांक :- ९-०२-२०२२

सही/-
**(आर.के.बामणे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड.**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री सुभाष राजाराम पवार, श्री संजय राजाराम पवार आणि श्री दत्तात्रेय राजाराम पवार यांच्या सामाईक मालकीच्या आणि प्रत्यक्ष ताबा वहिवाटीच्या क्षेत्रापैकी ०-१६-०० हे.आर. क्षेत्र त्यांचेकडून विकत घेण्याचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट/हिस्सा नंबर | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ११९/४ | ३९ | ०-३७-५० पो.ख.०-२६-२० **एकुण ०-६३-७०** | ६-३५ |

वर नमुद मिळकतीमधील श्री सुभाष राजाराम पवार, श्री संजय राजाराम पवार आणि श्री दत्तात्रेय राजाराम पवार यांचे सामाईक नावे दर्शविण्यात आलेल्या ०-३९-०१ हे.आर. क्षेत्रापैकी ०-१६-०० हे.आर. क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक :- १६/०२/२०२२

**ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
गुरूकृपा, महर्शी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेशेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. नं. ९८५०४८६९४२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे अशिल यांनी अब्दुल्लाह अब्दुल रौफ डोलारे व ताहिरा अब्दुल्लाह डोलारे रा.८७ ए, डोलारे बिल्डींग, २ रा मजला जामा मस्जिदच्या मागे पटेल मोहल्ला पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून खालील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः

**मौजे.कुंडलज, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५३ | ८ | ०.१२.०० पोट खराबा ०.०१.०० एकूण क्षेत्रफळ ०.१३.०० | ०.१५ |

सदरची मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील लहान मोठी झाडे तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविलेले आहे. तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचे साठेकरार, ताबकब्जा, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षिसपत्र,फरोक्त, चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

तारीख : १६/०२/२०२२

**ॲड. भारत अंकुश सावंत**
मु.मोठे वेणगाव, ता.कर्जत
जि.रायगड पिन ४१०२०१
संपर्क-९५५२२९६६२२

### ग्रामपंचायत कुरूळ
### ता.अलिबाग जि.रायगड
### जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत कुरूळकडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे, १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत कुरूळकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | घर क्रमांक | मालमत्तेचे स्वरूप | कर आकारणी रजिस्टर वरील नाव | अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ७६ | इतर पक्के बांधकाम | राजेंद्र प्रकाश मगर व निता राजेंद्र मगर | श्रीमती निता राजेंद्र मगर व कु.शुभ्रा राजेंद्र मगर |

सही/-
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत कुरूळ**
**ता.अलिबाग -रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रामपंचायत कुरूळ**
**ता.अलिबाग-रायगड**

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
### निविदा सूचना

बँकेचे केंद्र कार्यालय इमारतीमधील अग्निशामक यंत्रणा जोडणेसाठी वॉटर पंप व पॅनेल तसेच इतर आवश्यक मटेरीअल खरेदी करणेचे आहेत. तरी सदर क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकृत परवानाधारक फायर कंपन्यांकडून निविदा मागविणेत येत आहेत.

वरील कामाच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २२-०२-२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यांत. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग
दिनांक- १५.०२.२०२२

सही/-
**मुख्य कार्यकारी अलिबाग**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री.सुहास विलास राऊत यांनी श्रीमती देवयानी प्रभाकर म्हात्रे यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहिलेप्रमाणेः-

**मौजे-खांडस, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकत**

| सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| ४० | ३ | ०.४८.०० | ०.४१ |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क मृत्यूपत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेची विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख : १६/०२/२०२२

**ॲड.दिपाली राहूल शिंदे**
बी.एल.एस, एल.एल.बी
ॲडव्होकेट व नोटरी
मो.नं.९५६१७१९४९४/९०११७१६००१

म ह त्वा चे

## वरसोलीत खंडोबा पालखीचे आयोजन

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील अष्टागरातील अलिबाग शहर कोळीवाडा येथील खंडोबा मंदिराचा पालखी प्रदक्षिणा सोहळा चिंतामण भगत याच्या मार्गदर्शनाखाली मल्हारी मार्तंड खंडोबा देवाचा माघी पालखी सोहळा बुधवार १६ ते २० फेब्रुवारीपर्यंत साजरा होणार आहे. बुधवारी दुपारी ३ वाजता खंडोबा दरबार प्रांगणात उधाचा कार्यक्रम झाल्यावर शहरातून पालखीची प्रदक्षिणा होईल असे संयोजकांनी सांगितले आहे.

## शिवजयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

**पाताळगंगा :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मानवहीत लोकशाही पक्ष जिल्हा अध्यक्ष कृष्णा झोंबाडे यांच्यावतीने रिस येथे १९ फेब्रुवारी रोजी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिरात डायबेटिस आणि जनरल मेडिकलतपासणीउंची, वजन, बीपी, ऑक्सिजन, बॉडी मास इंडेक्स, कंप्लेट ब्लड काउंट, रँडम ब्लड शुगर, लिव्हर, किडनी, थायरॉइड ब्लड ग्रुप, यूरिन टेस्ट करण्यात येत असल्याचे समजते. तज्ज्ञ डॉ. मंगेश बंग, डॉ. सना कुरेशी, डॉ. अंजली बंग, डॉ. मनीष खोलार्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रीस हॉस्पिटल दांड आपटा रोड रीस येथे सकाळी ७ ते ११ यादरम्यान मोफत तपासणी होणार असून रसायनी परिसरातील गरजू रुग्ण, ईको चालक, रिक्षा चालक, यांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी ९६९९८२६७४७ मनीषा पवार ९५२७३८८४९२ या नंबरवर रजिस्टेशन करावे अशी विनंती झोंबाडे यांनी केली आहे.

# बागायतीच्या सातबाऱ्यावर 'खारभूमी' नोंद

*। आगरदांडा । प्रतिनिधी ।*

*मुरुड शहरातील एकदरा पूलाकडील अलिकडचा भाग व लक्ष्मीनारायण मंदिर परिसर व अन्य भागातील फार पूर्वीपासून बागायत जमिनीचे क्षेत्र असताना सुद्धा काही मालकी जमिनीच्या सातबाऱ्यावर खारभूमी लाभ क्षेत्रात समाविष्ठ असे शिक्के असल्याने जमिनीच्या मालकांना याचा खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. कोणतेही बांधकाम परवानगी करताना खारभूमी खात्याची ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते, तेव्हाच पुढील कार्यवाही होते. शहरातील किमान ३० टक्के जमिनीच्या सातबाऱ्यावर खारभूमीचे शिक्के बसल्याने लोकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.*

## मुरुड शहर वासियांची नाराजी, खारलँड विभागाचे दुर्लक्ष



मुरुड येथील खारलँड कार्यालयातर्फे पूर्वी यशवंती बंधारा बांधण्याचे प्रयोजन होते. परंतु सदरचा बंधारा मुरुड शहरात बांधलाच गेला नाही. परंतु सदरच्या बागायत जमिनी अधिग्रहण करण्यासाठी सातबाऱ्यावर मात्र खारभूमी क्षेत्र समाविष्ठ असे शिक्के मारले गेले. त्यामुळे मालकी क्षेत्र असलेले मालक मात्र मोठ्या अडचणीत सापडले आहेत. मालकी असताना सुद्धा बांधकाम अथवा जमिनीची विक्रीसाठी सुद्धा खारलँड विभागाची ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागत असल्याने जमिनीचे मालक धास्तावले असून महसूल विभागाकडे खेपा घालून सुद्धा हे शिक्के हटवले जात नसल्याने सर्व बागायतदार त्रस्त झाले आहेत.

### जमीन खारलँड विभागाची कशी?

**ज्या जमिनीवर गेल्या शंभर वर्षात नारळ सुपारीची झाडे असताना ही जमीन खारलँड विभागाची कशी होईल असा प्रश्न उपस्थित केला आहे. सर्व शासकीय यंत्रणेजवळ खेपा मारून सुद्धा नोंदी हटवल्या जात नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली आहे.**

याबाबत महसूल खात्याशी संपर्क साधून याबाबतची वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता असे समजले की, पूर्वीच्या काळात या जमिनीवर खारलँड विभागाचे बांध होते. जुन्या नोंदीच्या आधारावर खारलँड विभागाने अधिसूचना काढून जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले होते. जिल्हाधिकारी यांच्याकडून मंजुरी मिळाल्याने सदरच्या सर्व जमिनीवर शिक्के मारण्यात आले आहेत. जुन्या नोंदीच्या आधारावर सातबाऱ्यावर नोंदी झाल्यामुळे बागायत जमिनीचे मालक हैराण असून सदरच्या नोंदी काढून टाकण्याची मागणी करीत आहेत. परंतु खारलँड विभाग दुर्लक्ष्य करीत असल्याने सदरचा प्रश्न तसाच पडून आहे. याबाबत डॉ. दिलीप नथुराम बागडे यांनी २७ सप्टेंबर २०२१ रोजी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले होते. त्यांनी या निवेदनातून मुरुड गावठाण्यातल्या बागायत जमिनीवर खारलँड लाभ क्षेत्रात समाविष्ठ हा शिक्के काढून टाकण्याची मागणी केली होती. सर्व बागायतदारांनी हे शिक्के हटवण्याची मागणी केली आहे.

## किसान क्रांती संघटनेतर्फे बकरी पालन प्रशिक्षण

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य व स्टार स्वरोजगार केंद्र, बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मुस्लिम समाज सभागृह मजगांव येथे शेतीला पुरक व्यवसाय म्हणून बकरीपालन प्रशिक्षण मुरूडमधील ३५ शेतकऱ्यांना १२ ते २१ फेब्रुवारी पर्यंत तज्ञ पशुतज्ञांकडून देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थीला ग्रामीण विकास मंत्रालयाकडून प्रमाणपत्र व बँकेचे अर्थसहाय्य मिळणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटनाला श्रीधर जंजिरकर, आनंद राठोड, मीना श्रीमाळी, प्रसाद पाटील दिलीपकुमार भड, चंद्रकांत मोहीते, लिलाधर गोयजी, दिलीप विरकुड, संतोष दांडेकर अनिल नाकती, रियाज बंदरकर, शहाबाज उलडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## क्लिक दर्यावरी, डोल होरी...



■ मुरुड किनाऱ्यावर कोळीबांधव खोल समुद्रात मासेमारीसाठी जात नाही. कारण मासळी दुष्काळ असल्याने कोळी बांधव किनाऱ्यावर कमी खर्च होईल अशी मासेमारी करत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## विश्वकर्मा जयंती साजरी



**। पाली बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील परळी येथील विश्वकर्मा मंदिरात विश्वकर्मा जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी विविध कार्यक्रम व उपक्रम घेण्यात आले.

या सोहळ्यात विश्वकर्मा महाराजांचा अभिषेक सत्यनारायणाची महापूजा, हळदीकुंकू समारंभ, महाप्रसाद आणि जागर भजन आदी कार्यक्रम साजर झाले. यावेळी पाली उज्वला देसाई, मंगेश वाघमारे, धर्मेंद्र आंदेकर, आकांक्षा देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर कदम, अशोक कदम, नंदकुमार कदम, हरिश्चंद्र मोरे, सुनील कदम, राजेंद्र कदम, रवींद्र कदम, सचिन कदम, दिपक कदम, गणेश मोरे, प्रमोद कदम, विनोद कदम व सागर कदम यांनी मेहनत घेतली.

## सरसगड किल्ल्यावर वनसंपदा जळून खाक

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पालीतील सरसगड किल्यावर १४ फेब्रुवारी रोजी मानवनिर्मित वणवा लागला होता. या वणव्यामुळे किल्ल्याचा बहुतांश भाग जळून होरपळला. यामध्ये किल्ल्यावर नव्याने लावलेले रोपे व संवर्धन केलेली झाडे जळून खाक झाली. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

१० फेब्रुवारीला देखील सरसगडाला वणवा लागला होता. हा वणवा २४ तासांहून अधिक काळ सुरू होता. स्थानिक नागरिक व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वणवा विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. जे कोणी लोक वणवा लावत आहेत, त्यांना शोधून कडक शासन करण्याची गरज आहे. शिवऋण प्रतिष्ठानचे केतन म्हसके यांनी सांगितले.कृत्रिम वणव्यांमुळे संपुर्ण सजीवसृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो. त्यामुळे वणवे रोखण्यासाठी वनविभागाच्या माध्यमातून विविध उपाय व जनजागृती केली जाते. काही वेळेला विद्यार्थी पथनाट्य सादर करतात. या उपायांबरोबरच स्थानिक लोकांना व आदिवासींना वणव्याचे दुष्परिणाम सांगून त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. तसेच दृकश्राव्य माध्यमांद्वारे वणव्यांमुळे होणारी हानी सर्वांसमोर आणली गेली पाहिजे. लोकांनी देखील स्वयंस्फूर्तीने वणवे रोखणे व स्वतः लावणार नाही यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अशी अपेक्षा पर्यावरण प्रेमी व्यक्त करत आहेत.



## 'रक्तदानाचा उपक्रम भविष्यातही सुरू राहील'



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

लायन्स क्लब खोपोली, अल्टा लॅबोरेटरीज लिमिटेड, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था व सर्वो दय हॉस्पिटल समर्पण ब्लड बँक यांच्या विद्यमाने डॉ. रामहरी धोटे सभागृह- लायन्स सर्व्हिस सेंटर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचे उद्घाटन अल्टा लॅबोरेटरीजचे डायरेक्टर आदित्य आणि रीचा धोत्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी कोरोना काळात सुरू केलेला रक्तदानाचा उपक्रम भविष्यातही अल्टा लॅबोरेटरीजच्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने सुरू राहणार असे प्रतिपादन लायन्स क्लबचे अध्यक्ष महेश राठी यांनी केले. हनीफ कर्जीकर, अमोल कदम, अल्टा लॅबोरेटरिजच्या कामगारांसह शहरातील युवक, युवतींनी रक्तदानाचे कर्तव्य बजावले.



## सेवालाल महाराजांची जयंती साजरी

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबागमधील नाका कामगारांचे पीएनपी नगर येथे मंगळवार १५ फेब्रुवारी रोजी श्री संत सेवालाल महाराज जयंती उत्सव मंडळ, नाका कामगार अलिबाग बंजारा समाज यांच्यातर्फे श्री संत सेवालाल महाराज यांच्या २८३ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष प्रशांत नाईक, उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे, नगरसेवक अनिल चोपडा, नगरसेवक अजय झुंझारराव, प्रकाश दर्गु राठोड बंजारा समाज अध्यक्ष, गोरख राठोड, अनिल राठोड, शंकर जाधव, कणिराम पवार, चंदर पवार, लक्ष्मण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरूवात सकाळी शास्त्रीनगर येथे अभिषेक घालून व होम करून झाली. तर, दुपारी १२ वाजता अविवाहीत असणाऱ्या २०० मुली डोक्यावर कलश घेऊन शास्त्रीनगर ते कामगार नाका पीएनपी नगर अलिबागपर्यंत नाच करीत आल्या. त्यानंतर समाजाचे धार्मिक कार्यक्रम व भजन व किर्तनाचा सोहळा करण्यात आला.

## महामार्गावरील असुरक्षित कामामुळे अपघातामध्ये वाढ

**। महाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम संथगतीने करण्यात येत असून कामाकडे महामार्ग अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येते. महामार्गावर वाहतुकीचे प्रमाण वाढत असताना या मार्गावर अपघाताचे प्रमाण देखील वाढले आहे. असुरक्षित काम आणि नियोजनाचा अभाव असल्याने परशुराम घाटामध्ये होत असलेल्या अपघातामुळे महामार्गावरील काम आणि सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महाड शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या केंबुर्ली गावातील दत्तवाडी जवळच्या डोंगरातून मातीचा भराव कोसळण्याची

### अधिकारी जाणीव पुर्वक दुर्लक्ष, सुरक्षितेचा प्रश्न ऐरणीवर



शक्यता असून पावसाळ्यामध्ये अपघात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महामार्गाचे कशेडी ते माणगाव काम गेल्या तीन वर्षापासून काम सुरु असल्याने वाहतुकीची समस्या त्याचबरोबर महामार्गालगत असलेल्या गावांमध्ये देखील अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.एल ॲन्ड टी कंपनी काम करीत असून महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम देखील जागोजागी होत आहे. त्याकरीता सुरुंग लावले जात आहेत. त्याकरीता सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची असताना योग्य ती सुरक्षा घेतली जात नसल्याने अपघात घडत आहेत. चिपळूण जवळ परशुराम घाटांमध्ये मातीचा प्रचंड भराव कोसळला आणि दोन दिवस महामार्गावरील वाहतूक बंद करावी लागली. वास्तविक या ठिकाणी योग्य ते सुरक्षिततेचा उपाय योजण्यात आले असते तर एकाचा मृत्यु झाला नसता. त्याचप्रमाणे रस्त्याचा अंदाज लागत नसल्याने रात्रीच्या वेळी होणाऱ्या अपघतामध्ये वाढ झाली आहे. वास्तविक मुंबई गोवा महामार्गावरील वाहातूक दिवसेंदिवस वाढत असल्याने या मार्गावर दिशा दर्शन फलक, धोक्याच्या सुचना दर्शविणारे फलक लावणे अत्यंत आवश्यक असतना महामार्ग विभाग त्याच बरोबर रस्त्याचे काम करणारे ठेकेदार दुर्लक्ष करीत आहेत. काही ठिकाणी पर्यायी रस्ते तयार करण्यात आले असून त्या ठिकाणी देखील सुचना फलक लावणे आवश्यक आहे.



## अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता उपक्रम

**। अलिबाग । शहर वार्ताहर ।**

ओएसिस : बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा-अलिबाग-रायगड यांच्यावतीने अलिबाग नगरपरिषदेच्या विशेष सहकार्यातून अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.

पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व असणाऱ्या अलिबाग समुद्रकिनारा परिसरात स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने या उपक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी व अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांच्या प्रमुख मार्गदर्शनांतर्गत संस्थेचे साहिल साळुंखे यांच्या नेतृत्त्वाखाली करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत कोएसो आणि जेएसएम या शैक्षणिक संकुलामागील समुद्रकिनारा परिसर स्वच्छ करण्यात आला. याप्रसंगी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता दिक्षा सिरसट आणि अन्य कर्मचारी, संस्थेचे सचिव रोहित जोशी, सहसचिव यज्ञेश पाटील, ऋतुजा पाटील, नूपूर जैन, सार्थक गायकवाड, निशांत नवखारकर, प्रगती कासार आदी पदाधिकारी तथा स्वयंसेवक उपस्थित होते.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचे शिबीर

**। अलिबाग । वार्ताहर ।**

नेहरु युवा केंद्र संघटन, रायगड-अलिबाग तथा ओएसिस: बहुउद्देशीय संस्था, रेवदंडा-अलिबाग-रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ फेब्रुवारी रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. मुरूड तालुक्यातील मांडला परिसरातील श्रीगणेश मंदिर सभागृह येथे ठीक सकाळी ११ ते दुपारी ०१ यादरम्यान सदर उपक्रम संपन्न होणार आहे. अधिक माहितीसाठी सार्थक गायकवाड (९३७०९७६६८४) यज्ञेश पाटील (७८२१०८१०४९) यांच्यासह संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## केंबुर्लीत महिलांचा पिण्याच्या पाण्यासाठी आक्रोश

*। महाड । प्रतिनिधी ।*

*महाड शहरापासून अवघ्या तीन किलोमिटर अंतरावर असलेल्या केंबुर्ली गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली असताना पंचायतीचे सरपंच आणि सदस्यांकडून जाणीवपूर्व दुर्लक्ष करण्यांत येत असल्याचा आरोप गावांतील महिलांनी केला आहे. गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याने महामार्ग ओलांडून पाण्याकरीता जावे लागत असल्याने महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.*

*महामार्गावरील वेंबुर्ली गावामध्ये गेल्या अनेक वर्षापासून पिण्याच्या पाण्याची समस्या असताना ग्रामपंचायतीकडून पाणी टंचाई दूर होण्यासाठी प्रयत्न केले जात नसल्याचा आरोप महिला करीत आहेत. गावाची लोकसंख्या सातशेपेक्षा अधिक असून स्वतंत्र ग्रामपंचायत आहे. त्याचबरोबर महाड शहरापासून काही अंतरावर असल्याने गावाचा विस्तार देखील होत आहे. दिवसेंदिवस वाढणारी नागरी वसाहत आणि त्याकरीता पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये ताळमेळ नसल्याने ग्रामस्थ ग्रामपंचायतीच्या कारभारावर नाराज आहेत. महामार्गाच्या पलिकडे असलेल्या पाईपलाईनच्या लिकेज झालेल्या व्हॉल्वमधुन पाणी भरावे लागते. त्याकरीता महामार्ग ओलांडून जावे लागत असल्याने जीवीताला देखील धोका निर्माण झाला आहे.*

*केंबुर्ली गावाला पाण्याची सोय होण्यासाठी दत्तवाडी जवळच्या डोंगरावर एक पाण्याची साठवण टाकी बांधण्यांत आली होती. परंतु या टाकीतून पाण्याची गळती सुरु झाल्याने पावसाळ्यात टाकीमध्ये साठवलेले पाणी जानेवारी महिन्यात संपून जाते.*

*गावांतील वृद्ध महिलांना पिण्याच्या पाण्याकरीता दोन ते तीन किलोमीटर अंतराची देखील कधी कधी पायपिट करावी लागत असल्याचे सांगण्यांत आले. याबाबत ग्रामस्थांनी वारंवार तक्रार करुनही त्याच्या तक्रारीची दाद घेतली जात नसल्याचे अकखाल घोले यांनी सांगितले.*

*रस्त्याच्या कामामध्ये जागोजागी पाण्याची पाईपलाईन फुटल्यामुळे पाणी टंचाई निर्माण होते. वास्तविक सदरची पाईप लाईन जोडण्याचे तसेच दुरुस्त करुन देण्याची जबाबदार एल ॲंड टी कंपनीची असून दुरुस्त करुन देण्याचे आश्वासन दिले जाते, परंतु प्रत्यक्ष कामे केली जात नाहींत. येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे देखील तक्रार करण्यात आली.*



> **पावसाळ्यापासून जानेवारी महिन्यात पाण्याची समस्या जाणवत नाही. फेब्रुवारीनंतर पाण्यासाठी वणवण करावी लागते. वारंवार महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदारांकडून पाईप लाईनचे नुकसान होते.**
> **-अखलाख घोले, ग्रामस्थ**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.






**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते

**डॉ. सौ. अर्चना संदेश पाटील, वाढदिवसानिमित्त, अलिबाग**

## संपादकीय

# युद्धाचे ढग

आपल्यापासून कैक हजार किलोमीटर लांब असलेल्या रशिया आणि त्याचा शेजारीलदेश युक्रेन यांच्यात युद्ध होण्याची शक्यता असून कोणत्याही क्षणी संघर्ष पेटू शकेल असे वातावरण निर्माण झालेले आहे. आपल्या अर्थव्यवस्था जगाशी जोडल्या गेलेल्या असल्याने जगभरात कोणालाही सर्दी झाली तर आपल्यालाही शिंका येतातच. त्यामुळे गेल्या आठवडाहून अधिक काळात भारतातील शेअरबाजार याच शिंकांमुळे काही हजार अंशांनी खाली गेला आहे आणि गुंतवणूकदार हे युद्ध खरोखरीच पेटले तर काय करायचे या चिंतेने ग्रासले आहेत. रशियाला या युद्धाबाबत विचारले तर तो ठामपणाने आपली युक्रेनवर हल्ला करण्याची कोणतीही योजना नाही असे म्हणत असून ही अमेरिका आणि पाश्चात्य देशांनी पसरवलेली अफवा असल्याचे सांगत अशा निखालस खोट्या आणि धोकादायक प्रकाराचा निषेधही करत आहे. युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांनी पाश्चिमात्य देशांना भिती पसरवू नका असे आवाहन केले आहे तर फ्रान्सचा असा दावा आहे की पुतिन यांचे मुख्य उद्दिष्ट युद्ध करणे हे नसून त्याच्या दबावाखाली स्वत:च्या देशासाठी एक चांगला सुरक्षा करार मिळवणे आहे. मात्र या मतांवर कोणीही विश्वास ठेवायला तयार नाही. त्याला दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे रशियाने केवळ आठ वर्षांपूर्वी २०१४ साली युक्रेनवर आक्रमण करून तेथील मोठा भूभाग ताब्यात घेतला होता. त्यावर त्याने आपला ऐतिहासिक हक्क असल्याचा युक्तिवाद केला होता. तसेच, सुमारे एक लाखांचे रशियन सैन्य युक्रेनच्या सीमेजवळ तैनात केले गेले असून जवळपास तीस हजारांहून अधिक सैनिक शेजारच्या बेलारूस देशामध्ये सरावात गुंतलेले आहे. त्यामुळे संभाव्य धोक्याची गंभीर दखल जगभर घेतली जात आहे. नाटो संघटनेतर्फे जारी करण्यात आलेल्या चेतावणीनुसार सदर संघर्षाचा धोका खूप वास्तविक आहे. अमेरिकेचे म्हणणे असे की आता कोणत्याही दिवशी रशियाचे आक्रमण होऊ शकते. परंतु रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी मात्र त्यावर निर्णय घेतलेला नाही, असे म्हटले आहे. त्यामुळे भारतासह अनेक पाश्चात्य देशांनी त्यांच्या नागरिकांना युक्रेन सोडण्याचे आवाहन केले असून काही देशांनी युरोपीयन सुरक्षा संस्थांच्या निरीक्षकांनाही माघारी येण्यास सांगितले आहे. मुळात रशिया युक्रेनला का युद्धाची धमकी देत आहे, हे पाहायला हवे. युक्रेनच्या सीमा ज्या प्रकारे युरोपीयन समुदाय समूह देशांशी जोडलेल्या आहेत, तशाच त्या रशियाशीही जोडलेल्या आहेत. म्हणजे या दोन्ही देशांच्या सीमा त्याला आहेत. युक्रेनला युरोपीयन समुदायात जायचे आहे. म्हणजे पर्यायाने नाटो संघटनेत सामील व्हायचे आहे. त्याला रशियाचा विरोध आहे. कारण एक तर युक्रेन हे भूतपूर्व काळातील सोव्हिएत प्रजासत्ताकचा भाग होते. म्हणून त्याचे रशियाशी सखोल सामाजिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत. म्हणूनच तेथे रशियन भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. पाश्चात्य राष्ट्रांनी युक्रेनच्या मागे आपली शक्ती लावली आहे. अमेरिका आणि इंग्लंडने तर त्यांना शस्त्रे पुरवली आहेत. युद्ध झाले तर मॉस्कोला आर्थिक शिक्षा करण्याच्या उद्देशाने काही निर्बंधांवरही चर्चा झालेली आहे. पुतिन यांनी युक्रेनमध्ये आपले सैन्य उतरविल्यास, अमेरिका आणि युरोपियन मित्रराष्ट्रांनी रशियाला यापूर्वी कधीही न बसलेला आर्थिक फटका देण्याचे ठरवले आहे. मुख्यत्वे त्याला जगभरातील एका बँकेतून दुसऱ्या बँकेत पैसे फिरवण्याच्या प्रणालीतून बाहेर काढले तर त्याच्या अर्थव्यवस्थेचे तात्काळ आणि दीर्घकालीन नुकसान होईल, यात शंका नाही. युक्रेनबद्दल रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्या वैचारिक डावपेचाला गेल्या वर्षी सुरुवात केली होती. त्यांनी रशियन आणि युक्रेनियन लोकांना एक राष्ट्र म्हटले आणि त्यांनी युक्रेनच्या सध्याच्या सत्तारूढ नेत्यांना रशियासह विरोधी उपक्रम राबवित असल्याचे जाहीर वक्तव्य केले. याचे कारण युक्रेनला नाटोकडे जाण्यापासून रोखणे हे त्याचे मुख्य ध्येय आहे. कारण तसे झाले तर नाटो नियंत्रित करत असलेल्या सागरी आणि भूप्रदेशात रशियाला रोखले जाण्याची भिती आहे. ती भिती रास्तच आहे. म्हणून रशियाने नाटो आणि युरोपीयन समुदाय या दोन्ही युरोपीय संस्थांकडे झुकणाऱ्या युक्रेनला रशियाने आधीपासून प्रतिकार केला आहे. त्यामुळे युक्रेन नाटो या ३० देशांच्या संरक्षणात्मक युतीमध्ये सामील होणार नाही याची हमी देण्याची त्याची पाश्चिमात्य देशांकडे केलेली मागणी मुख्य आहे. युद्ध टाळण्यासाठी वाटाघाटी झालेल्या आहेत, होत आहेत. परंतु त्या मूक आणि बहिऱ्या माणसांतील संवाद आहेत असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे सगळेच युद्धाच्या ढगाच्या सावलीखाली आहेत.

# राजकारण हिजाबचे!



जयंत माईणकर



संपूर्ण कर्नाटकात गाजत असलेल्या हिजाब या वादाचा धर्माशी काहीही संबंध नाही, तर सर्व काही राजकारणाशी आहे. मे २०२३ च्या राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी आपल्याला हवा तो मुद्दा समोर करून राजकीय पोळी भाजण्याचा हा प्रयत्न आहे.

मात्र त्याचबरोबर शाळेत आणि कनिष्ठ महाविद्यालयात कोणता गणवेश असावा हे ठरवण्याचा अधिकार त्या संस्थेला असतो. अनेक मिशनरी शाळेत मुलींना मेंदी, टिळा लावण्यास मनाई असते. त्यांच्या शाळेच्या प्रार्थनेत येशू ख्रिस्ताचा उल्लेख असतो. आणि याठिकाणी शाळा आपल्या अधिकारांचा वापर करून आपले गणवेश ठरवतात किंवा निर्बंध घालतात.

कर्नाटकातील उडुपी या गावात शासकीय पूर्व विद्यापीठ महाविद्यालयात हा प्रकार घडला. अकरावी आणि बारावीला पूर्व विद्यापीठ शिक्षण म्हटलं जात. त्यामुळे अर्थात बारावीपर्यंतचा गणवेश ठरवण्याचा अधिकार शाळेच्या प्रशासनाला असतो.

गेल्या वर्षाच्या अखेरीपर्यंत हिजाब घालणे ही समस्या नव्हती. मुस्लिम विद्यार्थिनींना डोक्यावर स्कार्फ घालून वर्गात जाण्याची परवानगी होती आणि अगदी हिंदू विद्यार्थ्यांनीही कधीही आक्षेप घेतला नव्हता. मग, एके दिवशी, के रघुपती भट, उडुपीचे भाजप आमदार आणि

उडुपी येथील गव्हर्नमेंट पीयू कॉलेज फॉर गर्ल्स महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष, यांनी मुस्लिम मुलींना वर्गात हिजाब घालण्यापासून रोखण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय आपण नियमानुसार घेतल्याच त्यांचं म्हणणं. या शिक्षण संस्थेत कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या एकूण सुमारे एक हजार पैकी शंभरच्या आसपास अल्पसंख्यांक समाजाचे.

हिजाब वेगवेगळ्या रंगात आणि अनेक स्टाईल्समध्ये येतो. पाश्चात्य देशांमध्ये जे हिजाब सर्वाधिक दिसतात ते डोकं आणि गळा पूर्णपणे झाकतात, पण चेहरा स्पष्टपणे दिसतो.

हिजाबचे वेगवेगळे एकूण सात प्रकार सांगता येतील.

१) हिजाब

'हिजाब'चा शब्दशः अर्थ हा कुठलीही गोष्ट झाकणे किंवा त्यावर पांघरूण घालणे, असा आहे. आता हिजाब म्हटलं की लगेच मुस्लीम स्त्रिया डोक्यावरून घेतात तो स्कार्फ डोळ्यांसमोर येतो.

२) नकाब

नकाब चेहऱ्यासाठीचा एक पदर असतो, ज्यात डोळ्यांभोवतीचा भाग उघडा असतो. तो स्वतंत्रपणे फक्त चेहरा झाकण्यासाठी वापरतो येऊ शकतो, किंवा त्याला हिजाबच्या सोबतीनेही घालता येतं.

३) बुरखा

मुस्लीम महिला सर्वांत जास्त पर्दानशीन असतात त्या बुरख्यात. डोक्यापासून पायांपर्यंत, असं अख्खं शरीर झाकलेलं असतं आणि फक्त डोळ्यांसमोर येणाऱ्या भागावर एक जाळी असते.

४) अल-अमिरा

अल-अमिरा या वस्त्राचे दोन भाग असतात. एक म्हणजे कॉटन आणि पॉलीस्टरपासून बनलेली घट्ट बसणारी टोपी, आणि दुसरा म्हणजे एक झोळीसारखा स्कार्फ.

५) शायला

आखाती देशांमधला एक लोकप्रिय स्कार्फचा प्रकार म्हणजे शायला. हा लांबलचक स्कार्फ डोक्याभोवती गुंडाळून, कमीज किंवा टॉपवर खांद्याजवळ त्याला पिन लावली जाते.

६) खीमार

खीमार एक लांब केपसारखा कपडा असतो, जो डोक्यावरून थेट कमरेपर्यंत असतो. त्याने डोकं, गळा आणि खांदे झाकले जातात, पण चेहऱ्यावर पदर नसतो.

७) चादोर

इराणमधल्या महिलांमध्ये चादोर खूप प्रसिद्ध आहे. घराबाहेर पडायचं असल्यास त्या हे वस्त्र घालतात, जे पूर्ण शरीर झाकतं. कधी कधी त्याच्यासोबत एक छोटा हेडस्कार्फ असतो.

जगभरातल्या मुस्लीम महिला अनेक प्रकारचे हेडस्कार्फ बांधतात, मग तो हिजाब असो, नकाब किंवा बुरखा. यातला फरक सामान्यतः लक्षात येत नाही, म्हणजे कुठला पूर्ण चेहरा झाकतो, कुठला फक्त डोक्यावरून घेतला जातो, आणि कशात डोळ्यांवर जाळी असते.

आपल्याकडे जो बुरखा वापरला जातो, त्यालाच पर्यायी शब्द म्हणून हिजाब हा शब्दही वापरला जातो. पण त्याच्यामध्ये थोडासा फरक आहे. हिजाब हा फक्त डोकं झाकणं, आपण जसं स्कार्फ बांधतो त्यापद्धतीच्या प्रथेला हिजाब असं म्हणतात. आणि संपूर्ण चेहरा झाकून, काळा अंगावर झब्बा घालण्यात येतो त्याला बुरखा असं म्हणतात. सुन्नींमध्ये काळा बुरखा वापरण्यात येतो. तर शिया किंवा बोहरी समाजात रंगीबेरंगीसुद्धा वापरण्यात येतात. हिजाब आणि बुरखा यामध्ये फरक आहे. हिजाब म्हणजे चेहरा झाकणे तर बुरख्यामध्ये संपूर्ण शरीर झाकले जाते. पर पुरुषाने स्त्रीकडे वाईट नजरेने पाहू नये म्हणून मुस्लिम धर्मानुसार स्त्रियांनी बाहेर पडताना बुरखा परिधान करावा असं सांगितले जातं,. परपुरूष आपल्याकडे आकर्षित होऊ नये यासाठी बुरखा घातला जातो. असे नियम केवळ मुस्लिम महिलांना नाही, तर मुस्लिम पुरुषांना देखील आहेत. मुस्लिम पुरुषांनी परस्त्रीकडे नजर वर करून पाहू नये असे देखील धर्मात सांगण्यात आले आहे, अस सांगितलें जाते. वस्तुस्थिती अशी आहे की कुराणामध्ये हिजाब हा जो शब्द वापरलेला आहे, त्याचा अर्थ त्यांनी फक्त डोकं झाकणं आणि डिसेंट कपडे वापरणं या अर्थाने वापरलेला आहे. बुरखा हा नंतर आलेला प्रकार पुरुष प्रधान मानसिकतेतून आलेला आहे. स्त्री माझी प्रॉपर्टी आहे आणि माझ्या प्रॉपर्टीला इतरांनी पाहू नये अशी ती भावना आहे. हे इस्लाममधून आलेलं नाही. इस्लामी कल्चरमधून आलेलं आहे. कुराणात, इस्लाममध्ये ते नाही, असं मानणारा एक वर्ग मुस्लिम समाजात आहे.

अर्थात वर्गात हिजाब घालण्याच्या बाजूने आणि विरोधात निदर्शने करणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना campus front of india (CFI) आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (-BVP) यांचे समर्थन मिळाले. CFI ही मुस्लिम समाजाकरता काम करणारी संघटना आहे.

आता हिजाबचा मुद्दा चिघळल्याने काँग्रेस, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि दक्षिण कन्नड आणि उडुपीच्या मुस्लिम सेंट्रल कमिटीने विधानसभा निवडणुकीपूर्वी काही राजकीय उबदारपणा मिळवण्याच्या आशेने हिजाब पेटवण्यास सुरुवात केली आहे. आणि या घटनेमुळे तिहेरी तलाक संपवणाऱ्या भाजप सरकारला एक आयती संधी मिळाली आणि. शबरीमाला येथील अयप्पा मंदिरात १० ते ५० वयोगटातील स्त्रियांना मंदिरात प्रवेश नाकारण्याच्या मुद्द्यावर मात्र भाजप दुटप्पी भूमिका घेतो. गृहमंत्री अमित शहा यांनी तर सर्वोच्च न्यायालयाने सर्वांना प्रवेश देण्याच्या निर्णयाला विरोध करत न्यायालयाने निर्णय देताना आस्था मान्यता यांचा विचार करावा असा सल्लाही दिला तर कापड उद्योग मंत्री असलेल्या स्मृती इराणी पूजा करण्याचा अधिकार सर्वांना मात्र अपमान करण्याचा नाही, असं विषयाला सरळ उत्तर न देणार विधान केलं होतं. आपले पती पारसी असल्याने पारसी अग्यारीत मुलांना आणि पतीला प्रवेश दिला आणि हिंदू असल्यामुळे आपल्याला प्रवेश त्यांनी सांगितलं.

अर्थात भाजपसुद्धा आस्था आणि मान्यता यांना महत्त्व देण्याच्या विचारांचा असून शबरीमाला किंवा इतर हिंदू धर्मिक बाबतीत आस्था आणि मान्यता यांना धक्का न लावण्याच्या विचारांचा आहे. आता इतर धर्मीयांच्या सुद्धा आस्था आणि मान्यता असू शकतात. पण त्याबाबतीत सत्ताधारी भाजप मात्र उदासिन आहे.

तिहेरी तलाक, हिजाब, बुरखा याबाबतीत आस्था आणि मान्यता यांच्या विरोधात भाजप जातो. पण हिच आस्था आणि मान्यता सती प्रथा, केशवपन इत्यादी हिंदू समाजातील उच्चाटन झालेल्या प्रथांच्या बाबतीत ते मान्य करणार नाहीत. पण शबरीमाला मध्ये प्रथा पाळली जावी असं त्यांना वाटतं.

माझ्या मते धर्मातील कुठल्याही आस्थेला, मान्यतेला महत्त्व न देता केवळ शास्त्रीय आणि मानवतेच्या आधारावर त्यांचा विचार करावा. आणि ही भूमिका सर्वच धर्मांच्या बाबतीत लागू असावी.

जसा बारावीपर्यंत गणवेश हा सर्व जाती धर्मांच्या विद्यार्थ्यांना सारखाच आणि आवश्यक असतो. गणवेशात काही गोष्टी नसाव्या हेही सांगण्याचा अधिकार शाळांना असतो. या विषयावर काँग्रेसने योग्य भूमिका घेणं आवश्यक आहे. कारण भाजपला तोडीस तोड आव्हान कर्नाटकात फक्त काँग्रेस देऊ शकतो. त्यामुळे या विषयावर भाष्य करताना आपल्या हातून शहाबानो प्रकरणासारखी एखादी घोडचूक होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कोणी बिकिनी पासून काय घालावे काय नेसावे हा ज्याचा त्याचा वैयक्तीक प्रश्न आहे हे प्रियंका गांधी यांचं विधान योग्य आहे.

आता या विधानातील केवळ बिकिनी या शब्दाचा समाचार घेत कपड्यांमुळे बलात्कार वाढतात अस कर्नाटकातील भाजपचे आमदार रेणुकाचार्य यांनी म्हणणं हे त्यांच्या खालच्या दर्जाच्या बौद्धिक आणि वैचारिक पातळीच दर्शन घडवत. हिजाब परिधान केल्यामुळे आपल्याला वर्गात प्रवेश नाकारण्यात आल्याचा आरोप महाविद्यालयातील सहा विद्यार्थिनींकडून करण्यात आला आहे. हिजाबसाठी शिक्षणापासून वंचित ठेवणं योग्य आहे का हा खरा प्रश्न आहे.

मूळ पाकिस्तानची नागरिक असलेल्या नोबेल शांतता पुरस्कार विजेत्या मलाला युसुफझई हिनेदेखील मुलींना हिजाब घालून शाळेत जाण्यापासून रोखणं हे भयंकर असल्याचं म्हटलंय. भारतीय नेत्यांनी मुस्लिम महिलांना कमी लेखणं थांबवायला हवं' असंही मलालानं म्हटलंय. एकूण या प्रकरणाचा राजकीय फायदा घेण्याचा भाजप प्रयत्न करत आहे. ती संधी त्यांना मिळू न देण्यासाठी काँग्रेस ने आपली योग्य पावले आखावित. तूर्तास इतकेच!

वारा-वारा

प्रतिक कोळी

## परिवर्तन होत आहे

मानवी जीवनातील प्रेम ही सर्वोकृष्ट अशी भावना. या भावनांचे प्रकटीकरण करण्याचा, ती उत्कटपणे जगण्यासाठी पाश्चिमात्य संस्कृतीने जगाला दिलेली देणगी म्हणजे व्हॅलेंटाईन विक. याचे औचित्य साधून अनेक जोडप्यांनी आपापल्यापरीने हा प्रेम सप्ताह किंवा विक साजरा केला. अर्थातच, तथाकथित संस्कृती रक्षकांनी आपला आभासी बाणा न सोडता विरोध दर्शविला. 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी देशात पुलवाम्याची दुःखद घटना घडली होती. याच पार्श्वभूमीही अनेकांनी या दिवसाचा निषेध केला. सारांशाने, सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही प्रतिक्रिया या दिवसांमध्ये नोंदविण्यात आल्या. पण प्रेम हे जीवनांचे जीवन आहे. ज्ञानोबा माऊलींच्या उपदेशानुसार, जगावर प्रेम केल्याशिवाय जगत्पित्याचे प्रेम लाभत नाही. मुळात प्रेम ही फक्त दोन जीवांमधील भावना नाही. तर त्याची व्याप्ती सर्वसमावेशक आहे. आणि याचदृष्टिकोनातून अलिकडच्या काळात परिवर्तन घडताना आढळत आहे. 'रोझ डे'च्या दिवशी युवावर्गाने आपल्या जोडीदारांसोबत आपले मातापिता, आपले मार्गदर्शक तसेच सेवाकार्याने आपले आयुष्य खर्ची करणारे यांना स्नेहमय आदाराने फुल देऊ केले आहे. तर 'प्रॉमिस डे'च्या दिवशी अनेकांनी आपल्या कर्तव्याप्रति एकनिष्ठ राहण्याचे वचन स्वतःलाच दिले आहे. तर 'व्हॅलेंटाईन डे'च्या दिवशी सर्वाभूती प्रेमभाव राखत युवावर्गाने विविध समाजाभिमुख उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबीर, स्वच्छता, वस्त्रदान आदी उपक्रमांचा समावेश आहे. याबाबत तरुणाई अशी प्रतिक्रिया नोंदविते की, प्रेमामुळे दुःख झाल्यावर रक्तपात करण्यापेक्षा आनंदाने रक्तदान करत आपण जीवदान देऊ शकतो. बापकमाईचा पैसा नाहक खर्ची करण्यापेक्षा तो दानमार्गातून सत्कारणी लावू शकतो. अर्थात याबाबत ज्याच्या-त्याचा स्वतंत्र असा दृष्टिकोन आहे. पण उपभोग आणि विलास याकडे ओढा असणारी पिढी मानव्य दृष्टिकोनातून समाजाचा विचार करु लागली आहे, तशी पावले उचलू लागली आहे, ही परिवर्तनाची चाहूल म्हणता येईल. बाकी निमित्त काहीही असो, प्रेम ही जगण्याची आणि जगविण्याचीच गोष्ट..!

## पालक-पाल्य तणाव

भारतात पालक-पाल्य तणाव वाढत आहे. पिढ्यांपिढ्यांमधील अंतर हे कोणत्याच ठिकाणी नवीन नाही. पण दिवसागणिक हे अंतर अधिकाधिक ठळक होत आहे. भारतात वृद्धाश्रमांची संख्या वाढत असल्याची चिंता सनातन वर्गाकडून व्यक्त केली जात आहे. पण याबाबत सखोल अध्ययन होणे, आवश्यक आहे. शिरवाडकरांची 'नटसम्राट' ही साहित्यकृती अवघ्या रसिकांना परिचयाची आहे. मातापित्याच्या वृद्धापकाळात अपत्यांकडून करण्यात येणाऱ्या अवेहलनांचे दर्शन यात घडले आहे. पण आणखी एक बाब येथे अधोरेखित करता येते ती म्हणजे, जबाबदारीचे ओझे टाकताना अधिकारांचा अहंकार जुन्या पिढीला सुटवत नाही. आमच्या वेळी आम्ही हे केले, असा खोचक टोला देताना यावेळीची स्थिती ते समजून घेत नाही किंवा समजत असली तरी ते सामंजस्य घेत नाही. म्हातारपण हे दुसरं बालपण. पण जेव्हा तरुणपणात पोटची अपत्य एखादी गोष्ट समजवायला जातात, शंकाकुशंका विचारतात, आरोग्यविषयक सल्ले देतात, तेव्हा मात्र मोठेपणाच्या दर्पात त्या कोवळ्या मनावर उपहासाचा शिक्का उमटविला जातो आणि 'पेराल ते उगविते' या न्यायाने भविष्यात प्रतिक्रिया आल्याने धायमोकलून ओरड केली जाते. त्यात अलिकडच्या काळात एकुलतेपणा हा शाप ठरावा, इतका प्रेमाचा, आशापेक्षांच्या ओझ्याचा अतिरेकी मारा करण्यात येत आहे. बॅलेन्स असे काही नाही, फक्त दोष सांप्रत पिढीवर. त्यातच सोशल मिडीया आणि प्रसारमाध्यमांच्या आहारी जाणाऱ्या सर्व स्तरीय पिढ्यांमुळे उभयांमधील संवाद हरवत चालला आहे. सोशल मिडीयावर सहजतेने व्यक्त होणारी पिढीला प्रत्यक्ष अभिव्यक्त होणे, जमत नाही. या साऱ्याचा परिणाम होतो, तो पालक-पाल्य यांच्या नात्यावर. हे बदलायला हवे. श्रावणबाळाचा आदर्श देणाऱ्यांनी भारतीय संस्कृतीत जीवन जगताना ब्रम्हचर्य, संसार, वानप्रस्थ, संन्यास या आश्रमांचाही समावेश करण्यात आला आहे, याचेही भान राखणे, तितकेच आवश्यक. सारांशाने प्रत्येक पिढीने आपापल्या काळानुसार आपल्या कर्तव्यांची आणि अधिकारांची चौकट सांभाळणे आवश्यक आहे. तरच भारतीय समाजरचनेतील एकत्र कुटुंबव्यवस्थेला अर्थ राहील.




य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ।।१९।।

यः- जो कोणी; एनम्- याला; वेत्ति- जाणतो; हन्तारम्- हत्या करणारा; यः- जो कोणी; च-सुद्धा; एनम्- याला; मन्यते- मानतो; हतम्- मारला गेलेला; उभौ- दोघे; तौ- ते दोघे; न- कधीच नाही; विजानीतः- जाणतात; न- कधीच नाही; अयम्- है; हन्ति-मारतो; न- नाही; हन्यते- मारला जातो. हन्यमाने- मारले गेल्यावरही; शरीरे- शरीराचा.

कोणत्याही काळी आत्म्यासाठी जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. त्याचा जन्म झाला होता असेही नाही, त्याचा जन्म होतो असेही नाही आणि त्याचा जन्म होणार आहे असेही नाही. तो अजन्मा, सनातन, नित्य अस्तित्वात असणारा आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला तरी त्याचा नाश होत नाही.

तात्पर्य : गुणात्मकदृष्ट्या परमात्म्याचा सूक्ष्म अणुरुप अंश आणि परमात्मा एकरुप आहेत. शरीराप्रमाणे त्याच्यामध्ये काही बदल होत नाही. काही वेळा आत्म्याला कुटस्थ किंवा स्थिर असे म्हटले जाते. शरीरामध्ये सहा प्रकारची स्थित्यंतरे होतात. शरीर मातेच्या गर्भातून जन्म घेते, काही काळासाठी राहते, त्याची वाढ होते, त्यापासून काही परिणाम उत्पन्न होतात, हळूहळू त्याची झीज होते आणि शेवटी लुप्त होते; परंतु आत्मा अशा परिवर्तनातून जात नाही. आत्म्याचा जन्म होत नसतो; परंतु तो एक भौतिक शरीर धारण करीत असल्यामुळे त्या शरीराचा जन्म होतो. त्या ठिकाणी आत्मा जन्म घेत नाही आणि मरतही नाही. ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू हा निश्चितपणे आहे आणि आत्म्याला जन्म नसल्यामुळे त्याला भूत, वर्तमान आणि भविष्यही नाही. आत्मा हा सनातन, नित्य अस्तित्वात असणारा आणि पुरातन अर्थात, ज्याचा जन्म झाला आहे अशी इतिहासातही नोंद नाही. शरीराच्या प्रभावाखाली आपण आत्म्याच्या जन्माचा इतिहास वगैरे शोधत असतो. शरीराप्रमाणे कोणत्याही काळी आत्मा वृद्ध होत नाही म्हणूनच तथाकथित वृद्ध मनुष्याला बालपणातील किंवा तारुण्यातील चैतन्य आपल्यातही आढळून येते. शरीरातील होणाऱ्या बदलांचा आत्म्यावर काहीही परिणाम होत नाही. वृक्ष किंवा इतर कोणतीही भौतिक गोष्ट ज्याप्रमाणे क्षीण होते त्याप्रमाणे आत्मा क्षीण होत नाही. आत्म्यापासून इतर उपफलेही निर्माण होत नाहीत. शरीरापासून उत्पन्न होणारी उपफले म्हणजे मुलेबाळे आहेत व ती म्हणजे विविध स्वतंत्र जीवात्मेच असतात आणि केवळ शरीराच्या प्रभावामुळेच ती विशिष्ट मनुष्याची आहेत असे वाटतात. आत्म्याच्या उपस्थितीमुळे शरीराची वाढ होते; पण आत्म्याला उपफले नसतात किंवा त्याच्यामध्ये स्थित्यंतरही होत नाही. म्हणून आत्मा हा सहा प्रकारच्या शारीरिक स्थित्यंतरांच्या पलिकडे असतो

कठोपनिषदातही याच प्रकारचा श्लोक आपल्याला आढळतो.

न जायते ग्रियते वा विपश्चन्नायं कुतश्चिन्न बभूव कश्चित् ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ।।

या श्लोकाचा अर्थ आणि आशय हा भगवद्गीतेत असणाऱ्या श्लोकाप्रमाणेच आहे, पण या श्लोकामध्ये एक विपश्चित् हा एक विशिष्ट शब्द आहे. त्याचा अर्थ विद्वान किंवा ज्ञानमय असा होतो.

आत्मा हा पूर्ण ज्ञानमय आणि नित्य पूर्ण चेतनेने युक्त असतो. म्हणून चेतना हे आत्म्याचे लक्षण आहे. हृदयस्थ आत्म्याला जरी कोणी शोधू शकत नसला तरी तो आत्म्याची उपस्थिती केवळ चेतनेच्या उपस्थितीवरुनही जाणू शकतो. कधीकधी आकाशातील ढगामुळे किंवा इतर काही कारणास्तव आपल्याला सूर्य दिसू शकत नाही. तरीही सूर्याचा प्रकाश त्या ठिकाणी नेहमी असतो आणि आपली खात्री होते की, ही दिवसाची वेळ आहे. अगदी पहाटे थोडासा प्रकाश जरी आकाशात दिला तरी सूर्य आकाशात आहे असे आपण समजू शकतो.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

# एन.डी. : शेकापचे आधारस्तंभ

प्रा.डॉ. सुनील पवार

महाराष्ट्रातील डाव्या आघाडीचे नेते, शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरचिटणीस, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, पुरोगामी विचारवंत आणि आम कष्टकरी जनतेचे नेते म्हणजे भाई प्रा. डॉ. एन. डी. पाटील हे होत. महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात शोषणमुक्त व समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी अव्याहतपणे ते कार्यरत होते.



त्याचबरोबर महाराष्ट्रातील परिवर्तनवादी, सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्या अनेक संस्था व संघटनांचे ते आधारस्तंभ होते. रयत शिक्षण संस्था, दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था बेळगाव, महात्मा फुले शिक्षण संस्था इस्लामपूर, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, महाराष्ट्र राज्य सीमा प्रश्न समिती, जागतिकीकरण विरोधी कृती समिती, वीजदरवाढ विरोधी कृती समिती, नर्मदा बचाव आंदोलन इत्यादी अनेक सामाजिक व परिवर्तनवादी संस्था, संघटना व चळवळीमध्ये प्रा. एन डी पाटील साहेब यांचे महत्त्वाचे योगदान होते. शोषणमुक्त समाज निर्मितीसाठी मार्क्सवादी विचारधारा स्वीकारून समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी आपल्या कार्याला महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जोड त्यांनी दिली होती. आपल्या जीवनभर अविश्रांतपणे भारतीय संविधानाच्या सरनाम्याला अभिप्रेत असलेल्या नवसमाज निर्मितीच्या कार्यामध्ये पाटील साहेबांचे जे योगदान होते त्याची ओळख करून देणे ही गरज आहे.

शेतकरी कामगार पक्षात प्रवेश- पाटील साहेब कोल्हापूरला शिकायला आल्यावर त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे काम करण्यास सुरुवात केली या पक्षाच्या स्थापनेत असलेले केशवराव जेधे, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याबद्दल त्यांना प्रचंड आदर होता. तसेच शेतकरी कामगार पक्ष म्हणजे मार्क्स आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या तत्त्वज्ञानाचा मिलाफ होता आणि म्हणूनच शोषणमुक्त आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या कामास त्यांनी वाहून घेण्याचे ठरवले. सन १९४८ मध्ये शेतकरी कामगार पक्षाची जिल्हा शाखा स्थापन करण्यासाठी सांगली येथे जी बैठक झाली त्या बैठकीस ते हजर राहून पक्षकार्यास त्यांनी सुरुवात केली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सीमा आंदोलनमधील कार्य - संयुक महाराष्ट्राच्या व सीमा आंदोलना मधील डॉ. एन. डी पाटील यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी १९५८ पासून यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य मिळाले परंतु आपल्या दहा लाख बांधवांना आपण कर्नाटकात सोडून दिले याची जाणीव शेतकरी कामगार पक्ष आणि डावे पक्ष यांना होऊन या प्रश्नाला सतत चालना देऊन हा प्रश्न जिवंत ठेवण्याचे काम त्यांनी केले. या प्रश्नावर महाराष्ट्रातील निरनिराळ्या शहरातून तसेच दिल्ली सारख्या भारताच्या राजधानीत जे जे मोर्चे, धरणे धरण्याचे कार्यक्रम आखण्यात आले त्यामध्ये प्रा. एन डी पाटील यांना तुरुंगवास भोगावा लागला. सीमाप्रश्नावर बरीच आंदोलने झाली. जोपर्यंत सीमाप्रश्न सुटत नाही तोपर्यंत कोणीही सरकारला कसलाच सारा भरायचा नाही असे ठरले. १५० गावांमध्ये आंदोलन चालविले. सिमा प्रश्नासाठी शेतकरी कामगार पक्षाने १९५५ पासून सर्वात जास्त सत्याग्रह केले आहेत. महागाई विरोधी आंदोलन- १९६४ पासून महाराष्ट्रामध्ये जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. लोकांना धान्य, खाद्यतेले, साखर इत्यादी वस्तू बाजारात सहजासहजी मिळेनाशा झाल्या होत्या. रास्त भाव दुकाने सर्वत्र सुरू करण्याची गरज होती. अशा परिस्थितीत सर्वसामान्य जनतेची उपासमार सुरू झाली. १९६५ मध्ये महाराष्ट्र राज्यातील अशा उपाशी जनतेला संघटित करण्यासाठी प्रमुख विरोधी पक्षांनी उपासमार विरोधी कृती समिती स्थापन केली. या समितीच्या वतीने झालेल्या आंदोलनामध्ये पाटील साहेबांनी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरून सरकारच्या धोरणाविरुद्ध लोकजागृती केली. सरकारने यावेळी त्यांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक करून येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध केले होते. शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे आंदोलन - शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे आणि शेतीमालाच्या किमती सरकारने बांधून दिल्या पाहिजेत ही मागणी शेतकरी कामगार पक्षाने सातत्याने करून या प्रश्नावर सतत आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. पक्षाच्या स्थापनेपासून या विषयावर प्रश्नावर त्यांनी आंदोलने केली. एन डी पाटील यांनी या प्रश्नावर सतत आवाज उठविला असे दिसून येते. देशाची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण व स्वयम् गतिमान करण्याच्या दृष्टिकोनातून शेतीमालाच्या किफायतशीर किमतीचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे पटवून देण्यासाठी १९७० मध्ये भाईनी शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत ही पुस्तिका लिहिली आजही या पुस्तिकेचे महत्त्व जसेच्या तसे लागू पडत असल्याचे दिसते.

कापूस एकाधिकार योजनेसंबंधी कार्य- महाराष्ट्रामध्ये कापूस एकाधिकार योजना प्रा.एन.डी पाटील यांच्या प्रयत्नामुळे मिळालेली एक देणगी म्हणता येईल. कारण लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांनी सातत्यपूर्वक कापूस एकाधिकार खरेदीच्या प्रश्नाचा पाठपुरावा केला होता. सरकारने ही योजना सुरू करावी म्हणून शेतकरी कामगार पक्षाने सातत्याने आंदोलने करून सरकारचे या प्रश्नाकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करत होता. एकंदरीत भाई एन. डी. पाटील यांनी अखेरपर्यंत जे जीवन जगले आणि त्यांनी जशी कृती केली ते त्यांचे संपूर्ण जीवनच आजच्या पिढीसमोर एक आदर्श म्हणून उभे राहिले आहे. त्यांच्या जाण्याने देशाचे फार मोठे नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी कामगार पक्षाचा एक आधारस्तंभ कोसळला आहे. अशा थोर नेत्याच्या कार्याला व स्मृतीना विनम्र अभिवादन.

# दुरावलेले प्रवासी जोडण्याचा प्रयत्न

| रत्नागिरी | वृत्तसंस्था |

एसटीच्या दिवसाला २ लाख कि.मी.च्या फेऱ्या होऊन जिल्ह्यातून साधारण ६० ते ७० लाखांचे उत्पन्न मिळत होते. मात्र एसटी बंदमुळे गेली तीन महिने हे उत्पन्न थांबले आहे. आता फक्त ७०० ते ८०० कि.मी.च एसटी फिरत आहे. मोठ्या प्रमाणात प्रवासीवर्ग तुटला आहे. प्रवासी जोडण्यासाठी महामंडळाने नाना प्रयत्न केले होते. आता तुटलेले प्रवासी पुन्हा एसटीकडे वळवणे, हे आमच्यापुढे मोठे आव्हान आहे, असे प्रतिपादन एसटी विभागनियंत्रक प्रज्ञेश बोरसे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या संपाच्या भूमिकेवर त्या प्रसारमाध्यमांपुढे व्यक्त झाल्या. यावेळी ५० कंत्राटी कर्मचारी लवकरच हजर होतील. त्यांना प्रशिक्षण देऊन रत्नागिरी, लांजा, गुहागर या आगारात हजर करून घेतले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

एसटी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी सुरू केलेल्या बंदला तीन महिने होऊन गेले. एसटीची

## प्रज्ञेश बोरसे यांचे प्रतिपादन



सार्वजनिक वाहतूक सुरू व्हावी, यासाठी कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची मागणी मान्य करत ४१ टक्के पगारवाढ दिली. अनेक कर्मचाऱ्यांना त्याचा फायदा झाला. वेळेवर हा पगार होत असल्याचे एसटीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले; मात्र एसटीचे शासनामध्ये विलिनीकरण करण्यावर कर्मचारी अजूनही ठाम आहेत. त्यामुळे बंद चिघळत गेला आहे. यावर काही बैठका झाल्या; मात्र त्या निष्फळ ठरल्या. बंद लांबतच गेला असून ३ हजार ४९९ एकूण एसटी कर्मचाऱ्यांपैकी ८५२ कर्मचारी कामावर हजर झाले आहेत तर वारंवार आवाहन करूनही हजर न होणाऱ्या २५० कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे.

अवैध वाहतुकीमुळे आधीच काही प्रवासी तुटले होते. त्यात तीन महिने एसटी वाहतूक बंद आहे. त्याचा मोठा फटका एसटीला बसणार आहे. हे सर्व प्रवासी जोडण्याचे आमच्यापुढे मोठे आव्हान आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. जिल्ह्यातील बहुतेक आगारामध्ये काही प्रमाणात एसटी फेऱ्या सुरू झाल्या आहेत; मात्र रत्नागिरी, लांजा आणि गुहागर आगारात कमी प्रमाणात फेऱ्या सुरू आहेत. कंत्राटी कर्मचारी मिळावेत, यासाठी महामंडळाला प्रस्ताव दिला होता, तो मंजूर झाला आहे.

### जागा बदलण्याचे काम

जिल्ह्यात एसटीच्या ८४० गाड्या आहेत. त्यापैकी काही गाड्या सुरू असल्या तरी अनेक गाड्या जागेवर आहेत. त्या सुस्थितीत राहाव्यात यासाठी दरदिवशी ५ मिनिटे या गाड्या सुरु ठेवून आगारातच या ठिकाणाहून त्या ठिकाणी असे त्यांचा जागा बदलण्याचे काम सध्या सुरु आहे. तांत्रिक व इतर कर्मचाऱ्यांमुळे सर्व गाड्या चांगल्या आहेत, असे बोरसे यांनी सांगितले.

### एक दृष्टिक्षेप

* एकूण कर्मचारी : ३ हजार ४९९
* कर्मचारी कामावर हजर : ८५२
* एसटीचे रनिंग: ७०० ते ८०० कि.मी.
* हजर न होणारे बडतर्फ : २५०

## महत्त्वाचे

### विश्राम सावंत यांचे निधन

**रत्नागिरी** : तालुक्यातील वाटद पश्चिम येथील बौद्धजन पंचायत शाखा क्रमांक ३२ या शाखेचे धडाडीचे माजी अध्यक्ष, बावीस खेडी बौद्धजन संघ वाटद-खंडाळा संघटनेचे माजी कोषाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते तसेच वाटद गावचे माजी सरपंच विश्राम तुकाराम सावंत उर्फ व्ही.टी. सावंत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या माजी सभापती व जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्या ऋतुजा राजेश जाधव व डॉ.विकी सावंत यांचे ते वडील होत. दिवंगत व्ही.टी.सावंत यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, तीन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### दागिने लंपास

**रत्नागिरी** : तालुक्यातील गोळप सडा येथून गावी गेलेल्या महिलेच्या घरातील ५१ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेले आहेत. याबाबत जयश्री अशोक सोहनी यांनी पूर्णगड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. जयश्री या कामानिमित्त बाहेर गावी गेल्या होत्या. त्यांच्या घरातील काम करणाऱ्या एका महिलेने फायदा घेत मंगळसूत्र, सोन्याची अंगठी व कानातील दोन रिंग असा एकूण ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला. या संशयावरून अधिक तपास पोलीस हवालदार ललित देवुसकर करीत आहेत.

# पूर्वसूचना न देता आंबेत पूल बंद

| रत्नागिरी | वृत्तसंस्था |

मंडणगड परिसरातील आंबेत पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. मात्र, यासंदर्भात एकाकी घोषणा करत, हा पूल बंद केल्यामुळे परिसरात स्थानिक नागरिक व प्रशासन यांच्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले. अखेर पोलिसांना बंदोबस्ताकरिता पाचारण करावे लागले.

खा. सुनील तटकरे यांच्याबरोबर प्रशासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीनंतर त्यांनी पूल बंद करणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता हा पूल सर्व प्रकारच्या वाहनांसाठी अचानक बंद करण्यात आला.

मात्र, सकाळी म्हाप्रळ येथील विद्यार्थी व नागरिक आपापल्या कामांकरिता पलिकडे गेले होते. सर्व प्रकारची वाहतूक बंद होत असल्याच्या घोषणेची पूर्वसूचना नसल्याने व पर्यायी वाहतूक व्यवस्था न देता पूल बंद झाल्याने स्थानिक नागरिक व प्रशासन यांच्यात संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे पोलिसांना बंदोबस्ताकरिता पाचारण करावे लागले.

११ कोटी खर्च करून दुरुस्त केलेला व दुरुस्तीनंतर काही दोष निर्माण झालेला म्हाप्रळ-आंबेत पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. खा. सुनील तटकरे यांनी या पुलाची पाहणी केल्यावर स्थानिक नागरिकांच्या समस्याही जाणून घेण्याचा प्रयत्न केला होता. या पुलावरील वाहतुकीला पर्यायी व्यवस्था करून देण्याचाही विचार करीत असल्याचे सांगितले. सात दिवसांपूर्वी वाहतुकीसाठी पूल बंद करीत असल्याचे फलक पुलाच्या दोन्ही बाजूंना लावण्यात आले होते. आज अचानक कोणतीही कल्पना न देताच पूल बंद केल्याने स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला. फेब्रुवारी व मार्चमध्ये दहावी व बारावीच्या परीक्षा आहेत. अनेक विद्यार्थी शाळेसाठी आंबेत व गोरेगाव या ठिकाणी जात असल्याने ऐन परीक्षा काळात विद्यार्थ्यांची गैरसोय होणार आहे.

### पर्यायी व्यवस्थेचा पत्ता नाही

पुलावरील वाहतुकीस पर्याय देण्यापूर्वीच सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात आल्याने काही काळ संघर्षाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांची वाहतुकीची पर्यायी व्यवस्था कशा प्रकारे केली जाणार आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग वा संबंधित अन्य यंत्रणांनी अद्याप कोणताही जाहीर खुलासा केलेला नाही.

# वाहन अपघातात वृद्धाचा मृत्यू

|| वेळंब नालेवाडीतील घटना

|| दोन जण गंभीर

| गुहागर | वृत्तसंस्था |

तालुक्यातील वेळंब नालेवाडी येथे दोन दुचाकींमध्ये झालेल्या अपघातात एका वृद्ध व्यक्तीचा जागीच मृत्यू झाले असून, दोन दुचाकीस्वार गंभीर जखमी आहेत. जयराम बाबाजी नर्बेकर (५२) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

जानवळे ओझरवाडी येथील रहिवासी जयराम नर्बेकर हे त्यांच्या बहिणीला भेटण्यासाठी वेळंब नालेवाडी येथे गजानन नांदलस्कर यांच्या घरी दुचाकीवरुन आले होते. बहिणीला भेटल्यानंतर शृंगारतळीच्या दिशेने



जाण्यास निघाले. इतक्यात आबळोलीकडून शृंगारतळीच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या दुचाकीने जयराम नर्बेकर यांच्या दुचाकीला धडक दिली.

या धडकेत दोन्ही दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर आदळले. जयराम नर्बेकर यांच्या डोक्याला जबर मार लागला आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. तर स्पोर्टस बाईकवरील बासीत दाऊद चिपळूणकर आणि साईक हानिफ तवसाळकर (दोघेही रहाणारे पडवे) हे देखील गंभीर जखमी झाले.

गंभीर जखमी असलेल्या बासीत चिपळूणकर आणि साईक तवसाळकर यांच्यावर चिपळूण येथे खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. शिवाय त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# १२ एकरच्या ओसाड जागेवर फुलले नंदनवन

## डोंबिवलीच्या उद्योजकाची कमाल

| देवरूख | वृत्तसंस्था |

कोकणामध्ये पडीक चिरेखाणींचा मत्स्य व्यवसायासाठी अतिशय कल्पकतेने वापर करून पालकर दाम्पत्याने आगळा वेगळा मार्ग आणि त्यासोबत चिरेखाणींचा एक महत्वाचा उपयोग करण्याची दिशा दाखवली आहे. मत्स्य व्यवसायाबरोबरच देवरूखनजीकच्या विघ्रवली-माळवाडी येथे माळरानावर सेंद्रिय शेतीची कास धरून नंदनवन फुलवण्याची किमया डोंबिवलीचे प्रख्यात उद्योजक विजय पालकर यांनी साधली आहे.

विजय पालकर यांचा प्रामुख्याने रसायनाचा व्यवसाय आहे. त्यांच्या विविध केमिकल कंपन्यांमधून बाराशेहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांनी देवरूखपासून जवळच असलेल्या विघ्रवली माळवाडी येथे माळरानावर १२ एकर जागा खरेदी केली. जांभा दगड आणि ओसाड माळरानामुळे पालकर दाम्पत्याच्या निर्णयाची चेष्टा झाली.

दोन ते तीन वर्षांत या माळरानावर कृतिशीलता आणि शेतीमध्ये विविध प्रयोग करण्याचा ध्यास, सेंद्रिय शेतीवर भर आणि शेतीपूरक कुटिरोद्योग याद्वारे तेथे नंदनवन निर्माण करण्याची किमया त्यांनी साधली आहे. पडीक जागेला



जांभ्या दगडाची मजबूत तटबंदी केली. तेथील ३ पडीक मोठ्या चिरेखाणी होत्या. त्यांना सिमेंट काँक्रिटची भिंत घालून शेततळे निर्माण करण्यात आले. पावसाळी हंगामात त्यामध्ये पाणीसाठा करण्यात आला.

या शेततळ्यामध्ये माशांची पैदास करण्यात आली. प्रामुख्याने स्थानिक बाजारपेठेत मागणी असलेला पालू जातीच्या माशांचे उत्पादन घेण्यावर भर देण्यात आला. दोनशे रुपये प्रती किलो या भावाने येथे मासे विकले जातात. चिरेखाणीचा शेततळे आणि मासे निर्मितीबरोबर मोठ्या प्रमाणात पाणी अडवा आणि पाणी जिरवा या गोष्टीसुद्धा साध्य होत आहेत.

कोकणात ऊस, कॉफी, हळद, काळीमिरी यांचेसुद्धा भरघोस उत्पादन मिळू शकते, हे पालकर दाम्पत्याने दाखवून दिले आहे. त्यांनी या ठिकाणी शेणखतासाठी गोपालन, शेळीपालन आणि कुक्कुटपालन हे तीन व्यवसायसुद्धा सुरू केले आहेत. आज त्यांच्याकडे कोकणकन्याळ, आफ्रिकन गोट, उस्मानीबादी यांसारख्या ६६ दर्जेदार शेळ्या-मेंढ्या आहेत. पाचशेहून अधिक कोंबड्या आहेत. ऊस स्थानिक देवरूख बाजारपेठेत विकला जातो.

### कॉफीची लागवड

**पालकर दाम्पत्य केरळ या ठिकाणी गेले असताना त्यांनी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढी कॉफीची रोपे आणली. त्यांची विघ्रवली येथे लागवड केली; मात्र कॉफीची रोपे योग्य निगा आणि काळजी घेतली तर चांगले उत्पादन देऊ शकतात हे जाणवल्यामुळे कॉफीची एक हजार रोपांची लागवड करण्यात आली. आता त्यांना बऱ्यापैकी फूलधारणा होऊ लागली आहे. विजय आणि भारती पालकर यांनी या ठिकाणी काजूंच्या टरफलापासून तेलनिर्मिती, हळदप्रक्रिया उद्योग आणि फळप्रक्रिया, पशू आणि मत्स्यखाद्य निर्मिती उद्योग सुरू करण्याचा संकल्प असल्याचे सांगितले.**

# खेडमध्ये मातृपितृ दिन




| चिपळूण | प्रतिनिधी |

खेड तालुक्यातील वेरळ येथील श्रीसमर्थ कृपा विश्व प्रतिष्ठान चलित श्री समर्थ कृपा इंग्लिश मीडियम स्कूल व ज्यु. कॉलेज वेरळमध्ये मातृपितृ दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रत्येक वर्गातील प्रतिनिधी पालकांचा त्यांच्या पाल्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थी तथा पालकांनी आपले मनोगत व्यक्त केले तर ए.जे. काजारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास संस्थाध्यक्ष सुयश पाष्टे, शालेय व्यवस्थापन समितीचे चेअरमन उदय शेटवे, प्रशालेचे प्राचार्य एस. एस. अली, शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## देश-विदेश

# खोट्या आश्वासनांसाठीच मोदी, केजरीवाल

## राहूल गांधी यांचा घणाघात

| चंढीगड | वृत्तसंस्था |

खोट्या आश्वासनांसाठीच मोदी आणि केजरीवाल यांचे नाव आता जगजाहीर झाले असून, यांच्या आश्वासनाला पंजाबच्या जनतेने भुलू नये. नाहीतर विकास होवो न होवो, विश्वासघात नक्कीच होईल, असा घणाघात अखिल भारतीय काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला आहे.

पंजाब विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रचार मैदानात उतरलेले राहुल गांधी यांनी पटियालामध्ये एका प्रचार सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदी, अरविंद केजरीवाल आणि सुखबीर सिंग बादल यांच्यावर निशाणा साधला.

ते म्हणाले की, माझ्याबद्दल



मग तुम्हाला आवडो अथवा न आवडो मी या व्यासपीठावरून खोटी आश्वासनं देणार नाही. पंजाबाला धोक्यापासून दूर ठेवायचे असेल तर सांगितले.पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. पंजाबमध्ये २० फेब्रुवारीला मतदान पार पडणार आहे. या निवडणुकीत काँग्रेस, आप आणि भाजपमध्ये मुख्य लढत असून, तिन्ही पक्षांनी जोरदार तयारी केली आहे. या निवडणुकीत काँग्रेसला जास्त जागा मिळण्याची शक्यता आहे. तर शेतकरी आंदोलनमुळे पंजाबचा बहुतांश मतदार भाजपपासून दुरावल्याचं चित्र निर्माण झालं आहे. तर आम आदमी पक्ष देखील मोठ्या प्रमाणात तयारी करत असल्याचं दिसतंय. त्यामुळे पंजाबच्या विधानसभेवर कुणाचा झेंडा फडकणार याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

दरम्यान, देशातील पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला एकामागून एक झटका बसतोय. आता काँग्रेसचे बडे नेते आणि माजी कायदा मंत्री अश्विनी कुमार यांनी पक्षाला रामराम केला आहे.

### सत्यच बोलणार

**मी खोटी आश्वासने देणार नाही. जर कोणाला खोटी आश्वासने ऐकायची असतील तर त्यांनी पंतप्रधान मोदी, सुखबीर सिंग बादल आणि अरविंद केजरीवाल यांची भाषणे ऐकली पाहिजेत. मला फक्त सत्य बोलायला शिकवले गेले आहे. असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे.**

# *हिजाब प्रकरणाची सुनावणी थांबविण्याची मागणी*

*| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |*

*उत्तर प्रदेशसह पाच राज्यांमध्ये सुरू असलेल्या निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष हिजाब वादाचा एकमेकांच्या विरोधात वापर करीत आहे. विधानसभा निवडणुकीत राजकीय पक्ष स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी हा मुद्दा उपस्थित करीत आहेत. तेव्हा कर्नाटक उच्च न्यायालयाने २८ फेब्रुवारीपर्यंत सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती वकिलाने केली आहे. कर्नाटकात हिजाबच्या वादावर सुनावणी सुरू आहे.*

*शैक्षणिक संस्थांमध्ये डोक्यावर स्कार्फ वापरण्याच्या बंदीला आव्हान देणाऱ्या विद्यार्थिनींच्या याचिकावर कर्नाटक उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या प्रकरणानंतर राज्यभरात निदर्शने सुरू झाली आहेत. हिजाबच्या वादामुळे सरकारला काही दिवस शाळा बंद ठेवाव्या लागल्या आहेत. काल दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पुन्हा सुरू झाल्या. विद्यार्थ्यांनी कॅम्पसमध्ये प्रवेश करण्यापूर्वी स्कार्फ काढावा असा शिक्षकांचा आग्रह होता.*

*उच्च न्यायालयाने शांततेचे आवाहन केले आहे. राज्य सरकारला शाळा पुन्हा सुरू करण्याचे आवाहन केले आहे. जेणेकरून विद्यार्थी त्यांच्या वर्गात परत येऊ शकतील. याचिकांवर सुनावणी होईपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना त्यांचा धर्म कोणताही असो वर्गात भगवी शाल, स्कार्फ, हिजाब घालण्यास प्रतिबंधित करतो, असे अंतरिम आदेशात न्यायालयाने म्हटले आहे.*

*निवडणुकांमुळे राजकीय नेत्यांच्या भाषणात हिजाबचा उल्लेख केला जात आहे. शाळांमध्ये ड्रेस कोड पाळण्यावर भर देत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, देश इस्लामिक कायद्याने नव्हे, तर संविधानाने चालवला जाईल. दुसरीकडे 'बिकिनी असो, बुरखा असो, जीन्स असो की हिजाब असो', महिलांना काय घालायचे हे ठरवण्याचा अधिकार आहे, असे काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा म्हणाल्या होत्या.*

# *चिमुरडीची लैंगिक शोषणानंतर हत्या*

*| हैलाकांडी | वृत्तसंस्था |*

*आसाममधील हैलाकांडी जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आलीय. हैलाकांडी येथे एका १५ वर्षीय आरोपीने त्याच्या शेजारी राहणाऱ्या ६ वर्षाच्या चिमुरडीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली. ही मुलगी ९ फेब्रुवारीपासून बेपत्ता होती. पोलीस तिचा शोध घेत होते.*

*दरम्यान, तिचा मृतदेह १२ फेब्रुवारी रोजी जवळच्या जंगलात सापडला. ही घटना घडवणाऱ्या १५ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आलीय. ही घटना हैलाकांडी जिल्ह्यातील सुल्तानीचेरा भागामधील आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ फेब्रुवारीला बेपत्ता होण्यापूर्वी ही मुलगी परिसरातील इतर मुलांसोबत खेळत होती, असं प्राथमिक तपासात समोर आलंय. या मुलीचा सर्वत्र शोध घेतला असता, तिचा मृतदेह १२ फेब्रुवारी रोजी जवळच्या जंगल परिसरात सापडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिचा मृत्यू होण्यापूर्वी आरोपीने तिला गंभीर जखमी केले होते.मृतदेह शवविच्छेदनासाठी हैलाकांडी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आला आहे. मुलाचे समर्थन करुन पुरावे नष्ट केल्याबद्दल आरोपीच्या वडिलांनाही अटक करण्यात आली आहे. या घटनेनंतर आसाम राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा डॉ. सुनीता चक्रवर्ती यांच्या सूचनेनुसार, गुवाहाटीतील एक पथक हैलाकांडी इथे पोहोचले असून, या प्रकरणाची चौकशी करत आहे.*

# ओमप्रकाश यांनी मागितले निवार्चन आयोगाकडे अभय

| लखनऊ | वृत्तसंस्था |

भारतीय समाज पक्षाचे (सुभाएसपी) प्रमुख ओमप्रकाश राजभर यांनी भारतीय निवार्चन आयोगाकडे निवडणूक काळात अभय मागितले आहे. वाराणसीमध्ये वकिलांशी झालेल्या भांडण आणि गोंधळामुळे आपल्यावर हल्ला करण्यात आला. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना माझा खून करायचा आहे, असा आरोप करत, भाजप असंविधानिक कृत्य करण्यात वाकबगार आहे, असे ताशेरे त्यांनी बोढले आहेत.

नुकताच वाराणसीमधील शिवपूर विधानसभा मतदारसंघातून मुलगा अरविंद राजभर यांच्या उमेदवारीसाठी पोहोचले असता त्यांच्यावर हल्ला

### योगींवर हत्येचा आरोप

### भाजपावर ओढले तोशेरे



करण्यात आला. या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

ओमप्रकाश म्हणाले की, वाराणसीमध्ये मला मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. गोळी मारा, जे होईल ते बघितले जाईल असे सांगण्यात आले. अशी गुंडगिरी आयुक्त आणि डीएम यांच्या चेंबरसमोर झाली. तेव्हा अरविंद राजभर आणि मला सुरक्षा देण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी तीनच जणांना जाण्याची परवानगी असताना एवढी गर्दी कोठून आली, असा सवाल राजभर यांनी उपस्थित केला. हा प्रकार डीएम आणि आयुक्तांच्या संगनमताने घडला. भाजप सरकार संविधानाचे पालन करीत नाही, असेही राजभर म्हणाले आहेत.

# घरउभारणीस सुरुवात

**मुंबई** : रायगड, महाड येथील दरडग्रस्त तळीये गावाच्या पुनर्वसनासाठी अखेर म्हाडाच्या कोकण मंडळाने बांधकामासाठी निविदा जारी केली आहे. आता मार्चमध्ये २६३ घरांच्या कामाला कोकण मंडळाकडून सुरुवात करण्यात येणार आहे. प्राधान्याने मूळ ६३ विस्थापितांना शक्य तितक्या लवकर घरे देण्याचा म्हाडाचा प्रयत्न आहे. त्यामुळे या ६३ घरांचे काम वेगात पूर्ण करून मेमध्ये या घरांचा ताबा देण्याचा निर्णय म्हाडाने घेतला. जुलैमध्ये तळीये गावातील कोंढाळकरवाडी येथे दरड कोसळली. यात ८० हून अधिक जणांचा बळी गेला. ६३ कुटुंब उद्ध्वस्त झाली. या कुटुंबाचे पुनर्वसन करण्याची, त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आणि नैसर्गिक संकटाचा सामना करू शकणारी अशी घरे बांधण्याची जबाबदारी म्हाडाने घेतली.

# *कॅनडात आणीबाणी जाहीर*

## पंतप्रधान ट्रुडो यांची भूमिका

*| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |*

*कोव्हिड काळात लादलेले निर्बंध मागे घेण्यासाठी निदर्शने सुरु असून, ही निदर्शने संपवण्याकरता कॅनडाने आणीबाणीची घोषणा केलीय. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी देशात आणीबाणी कायदा लागू केलाय.*

*न्यूज एजन्सी एएनआयच्या वृत्तानुसार, कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी कोव्हिड राजवटीविरोधातील निदर्शनं संपवण्यासाठी संसदेत आपत्कालीन कायद्याची मागणी केली आहे.*

*पंतप्रधान ट्रूडो यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, देशात आणीबाणी कायदा लागू करत आहोत. कारण, कॅनडातील ट्रक चालक आक्रमक झाले असून, त्यांनी देशव्यापी आंदोलन सुरु केलंय. आमची अर्थव्यवस्था पूर्णपणे जनतेच्या सुरक्षेवर अवलंबून आहे. त्यामुळे आम्ही बेकायदेशीर आणि धोकादायक आंदोलनाला परवानगी देऊ शकत नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे.*

*दरम्यान, कोव्हिडशी संबंधित निर्बंधांविरोधात कॅनडात निदर्शनं सुरु आहेत. कॅनडाच्या राजधानीसह अनेक शहरांत आंदोलनं होत आहेत. राजधानी ओटावामधील अनेक भाग ठप्प झाले आहेत.*

*ओटावा येथे ५० हजारांहून अधिक ट्रक चालक निदर्शनं करत आहेत. दरम्यान, आंदोलक पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्याचीही मागणी करत आहेत.*

# माथेरानमध्ये काँग्रेस, भाजपचा स्वबळाचा नारा

। नेरळ । वार्ताहर ।

राज्यातील राजकारणात आपल्या पक्षाचा झेंडा फडकला पाहिजे म्हणून माथेरान गिरिस्थान नगरपरिषदकडे सर्व राजकीय पक्ष पहात आहेत. त्यामुळे माथेरान पालिकेवर आपल्या पक्षाचा झेंडा फडकावा म्हणून प्रामुख्याने भाजप आणि राष्ट्रीय काँग्रेस या दोन पक्षांनी कंबर कसली आहे. दरम्यान, या दोन्ही पक्षांनी पालिका निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्धार करून गेल्या वर्षांपासून तयारी सुरु आहे. त्यामुळे माथेरान पालिकेची सार्वत्रिक निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता वाढली आहे.

ओबीसी आरक्षणामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे गेल्या असल्याने माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक अद्याप झालेली नाही. मात्र, नोव्हेंबर-डिसेंबर २०२१ मध्ये पालिकेची सार्वत्रिक निवडणूक होणार म्हणून माथेरानमधील सर्व राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरु केली होती. भाजपाने शिवसेनेचे नगरसेवक फोडल्यापासून भाजपकडून स्वबळाचा नारा देण्यात आला आहे. तर राष्ट्रीय काँग्रेसने राज्यातील सत्ताधारी महाविकास आघाडीचा प्रयोग माथेरानमध्ये होणार नाही, अशी खूणगाठ बांधत



स्वबळाची तयारी सुरु केली होती.

माथेरानमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्ष १५ वर्षांपूर्वी अडीच वर्षासाठी सत्तेवर आला होता. त्यावेळी हा पक्ष त्या आधी सत्तेवर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्या माथेरान विकास आघाडीच्या भ्रष्टाचाराची उदाहरण देऊन जांभा दगडाचे राजकारण यशस्वी करीत सत्तेवर आला होता. त्यावेळी काँग्रेसपक्षाला अडीच वर्षानंतर सत्ता टिकवून ठेवता आली नव्हती. आता काँग्रेस पक्ष यावेळी देखील भ्रष्टाचार या मुद्यांवर पुन्हा एकदा रान उठवून निवडणुकीची तयारी करीत आहे.

दरम्यान, माथेरानसारख्या ३००० मतांच्या शहरात कोणत्याही राजकीयपक्षाला फारसे मोठे मताधिक्य मिळणार नाही हे सर्व राजकीय पक्ष जाणून आहेत. मात्र माथेरान हे थंड हवेचे ठिकाण राज्यातील नेत्यांचे दृष्टीने महत्त्वाचे केंद्र आहे. त्यामुळे माथेरान गिरिस्थान नगर परिषदेवर आपल्या पक्षाची सत्ता आहे, हे दाखविण्यासाठी माथेरान पालिका सर्व राजकीय पक्षांसाठी महत्वाची बनली आहे. त्यात राष्ट्रीय काँग्रेस सत्ताधारी यांचा भ्रष्टाचार हा मुद्दा पकडून निवडणूकीला सामोरे जाणार आहे. त्याचवेळी पारदर्शक कारभाराची स्वप्ने पाहणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेस स्वबळावर माथेरान काबीज करते काय? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणारे आहे. तर भाजप माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेवर कमळ फुलविण्यासाठी कामाला लागला असून भाजपचे जिल्हा पदाधिकारी यांनी दोन दिवस कार्यकर्ता प्रशिक्षणातून माथेरान वर विजय मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे माथेरान पालिकेची सार्वत्रिक निवडणूक बहुरंगी होणार हे जवळपास नक्की आहे.

> राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असून, आम्हाला वरिष्ठांचे आदेश असल्याने आम्ही महाविकास आघाडीचा धर्म पाळणार आहोत. पण, आघाडी करण्यासाठी मित्र पक्ष तयार नसेल, तर मात्र आम्ही स्वबळावर लढू.
> – अजय सावंत, माजी नगराध्यक्ष, माथेरान

## आरोप–प्रत्यारोपांच्या फैरी

**सध्याच्या सत्ताधारी शिवसेनेने सत्तेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला असून, पारदर्शक कारभारासाठी सत्तेवर बसण्याचे आवाहन जनतेला केले जात आहे. काँग्रेसकडून पालिकेतील विकासकामात भ्रष्टाचार झाला असून, स्वच्छ कारभार करण्यासाठी सत्ता देण्याचे आव्हान केले आहे. तर भाजप माथेरानमध्ये फारसे गंभीरपणे घेत नव्हते. पण शिवसेनेचे १० नगरसेवकांनी शिवसेनेतून भाजपात प्रवेश केला आणि भाजपदेखील आता माथेरान पालिकेवर कमळ फुलविण्यासाठी सज्ज झाला आहे.**

## महत्त्वाचे

### वावंढळ येथे अखंड हरिनाम

। रसायनी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील चौक कोयना प्रकल्पग्रस्त वसाहत कोयना जांब्रूक (वावंढळ) येथे सालाबाद प्रमाणे अखंड हरिनाम सप्ताह श्रीदेवी जानाई-इंजाई व विठ्ठल रुक्मिणी मंदिरात संपन्न झाला. कोयना प्रकल्पग्रस्त वसाहत वावंढळ येथे सात दिवस अखंड हरिनाम सप्ताह सुरू होता. पहाटे काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, संध्याकाळी हरिपाठ व रात्री जागर असे नित्यनेमाने कार्यक्रम व्हायचे. याही वर्षी कोरोना व ओमिक्रॉन यांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन शासकीय नियमांचे पालन करून मर्यादित स्वरूपात हा हरिनाम सप्ताह पार पडला. यंदा हे ५३ वे वर्षे होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ, तरुण मंडळ, महिला मंडळ यांनी मेहनत घेतली.

### देवगड येथे हरिनाम सप्ताह

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा, शिवनगर, नवी पोसरी, सावळे, देवळोली, आंबिवली आदी परिसरातील वारकरी संप्रदायातील नागरिक देवगड अहमदनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहात चार दिवस सामील झाले होते. या श्री क्षेत्र देवगड अहमदनगर ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन सावळे -रसायनीकरांच्या वतीने देवगड येथे पार पडले. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी रसायनी परिसरातील जवळपास शंभरपेक्षा जास्त वारकरी सांप्रदाय उपस्थित होता.

### रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा येथील स्वराज माळी या विद्यार्थ्याचा रिक्षात विसरलेला मोबाईल रिक्षाचालक विनोद शर्मा यांनी परत करुन प्रामाणिकपणा दाखवून दिला आहे. हा प्रकार सोमवारी घडला. स्वराज हा अंबानी स्कूलचा विद्यार्थी आहे. तो रिक्षातून शाळेत निघाला होता. त्यावेळी त्याचा २५ हजारांचा मोबाईल रिक्षातच विसरला. रिक्षाचालक शर्मा यांनी त्याचा शोध घेत त्याला मोबाईल परत केला.

# बोर्ली-वांजळे रस्त्याची दुरवस्था

## रस्ता उखडल्याने ग्रामस्थ संतप्त

## संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

। दिघी । प्रतिनिधी ।

बोर्लीपंचतन शहरांतर्गत येणाऱ्या वांजळे रस्त्याचे काम जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाकडून करण्यात येत आहे. मात्र, दीर्घ प्रतीक्षेनंतर बनत असलेल्या रस्त्याचे काम निकृष्ट असल्याने चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे निकृष्ट रस्ता नागरिकांच्या वाट्याला आल्याचे आरोप नागरिक करत आहेत.

बोर्लीपंचतन शहरातून अंतर्गत ग्रामीण रस्ता असल्याने कित्येक वर्षे नूतनीकरणाची मागणी करण्यात येत होती. या रखडलेल्या वांजळे रस्त्याचे



■ बोर्लीपंचतन गावातील या रस्त्यावर नुकतेच डांबरीकरण झालेल्या रस्त्याची पसरलेली खडी

काम निकृष्ट होत आहे. नव्याने होत असलेल्या रस्त्याला डांबर अल्प प्रमाणात वापरल्याने प्राथमिक स्तराचे डांबरीकरण उखडत आहे. या रस्त्यासाठी ग्रामस्थांनी अनेक वर्षे संघर्ष केला. त्यामुळे रस्त्याच्या कामात होत असलेला निकृष्ट दर्जामुळे ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. संपूर्ण कामाची चौकशी करावी आणि कामाचा दर्जा उच्च राखला जावा, अशी त्यांची मागणी आहे.

आठ दिवसांपूर्वी रस्त्याच्या प्राथमिक स्तराचे डांबरीकरण केले; मात्र डांबराचा वापर कमी प्रमाणात केल्याने ते उखडले आहे. नुसत्या हातानेसुद्धा खडी बाजूला करता येत आहे. प्राथमिक स्तराच्या खाली खडीकरण करणे आवश्यक आहे. मात्र, डांबरीकरणाच्या खाली माती असल्याचे दिसते. सध्याच्या अवस्थेत रस्त्याचा वापर केल्यास संपूर्ण रस्ताच खराब होईल.

त्यामुळे संपूर्ण कामाची तत्काळ चौकशी करून झालेल्या कामाचा दर्जा सुधारून काम करावे यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. रस्त्या बाबत माहिती घेण्यासाठी श्रीवर्धन येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागीय शाखा अभियंता डोंगरे यांना विचारले असता मी बाहेर आहे. आल्यावर बघेन असे उत्तर दिले.

> अवघ्या दोन दिवसांत गावातील रहदारीच्या असणाऱ्या वांजळे रस्त्याची डांबर व खडी उखडली आहे. काही ठिकाणी तर खडी व डांबराचा वापरच केलेला नाही. वाहतूक सुरू होण्याआधी हाताने खडी उखडते, याची गांभीर्याने संबंधित विभागाने दखल घेतली पाहिजे.
> - चंद्रकांत धनावडे. शेकाप कार्यालयीन सचिव श्रीवर्धन.

**सोशल मिडियावर पडसाद**

शासनाचे लाखो रुपये रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणावर खर्च होत असताना रस्ते वर्षभर नाही तर सहा महिनेही का टिकाव धरत नाही, हा चौकशीचा विषय आहे.

# महेश खाडे यांना राज्यस्तरीय युवा शिक्षक पुरस्कार



। नेरळ । वार्ताहर ।

'शिक्षणविवेक', 'टी. बी. लुल्ला चॅरिटेबल फाऊंडेशन, सांगली आणि श्री मुकुंद भवन ट्रस्ट' यांच्या संयुक्त विद्यमाने २०२२ साठी दिल्या जाणाऱ्या 'शिक्षण माझा वसा' या राज्यस्तरीय युवा शिक्षक पुरस्कारासाठी महेश गोमाजी खाडे याची निवड करण्यात आली. ते रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानिवली, तालुका कर्जत येथे कार्यरत आहेत. English reading by Phonetics या विषयावर उपक्रम सादर केला होता. १३ फेब्रुवारी २०२२ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड पुणे येथे संपन्न झालेल्या या सोहळ्यामध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये महेश खाडे यांना सन्मानचिन्ह, शिक्षणविषयक तीन पुस्तके आणि ५००० चा धनादेश व १५०० रुपये रोख देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# कॅन्सरग्रस्त महिला, मुलामुलींना मिळणार अर्थसहाय्य

। पनवेल । वार्ताहर ।

महिला व बालकल्याण समितीची बैठक १४ फेब्रुवारी रोजी सभापती हर्षदा उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. यात कॅन्सर या दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या महिलांना व मुलामुलींना अर्थसहाय्य मिळण्याचा विषय महिला बालकल्याण समितीच्या बैठकित मंजूर करण्यात आला.

यावेळी सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, तिलकराज खापर्डे व इतर सदस्य ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते.



बदलत्या जीवनशैली व प्रदुषणामुळे कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे. कॅन्सर आजाराच्या उपचाराकरिता होणारा खर्चही मोठा असतो. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अशा गरजू लोकांना रूग्णाच्या औषधोपचाराकरिता मदत म्हणून अर्थसहाय्य दिल्यास त्यांना आर्थिक संकटातून बाहेर येण्यास मदत होईल. या हेतूने हा विषय बैठकीत मांडण्यात आला.

या विषयास सर्व सदस्यांनी मंजूरी दिली. आयुक्त गणेश देशमुख आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील कार्यवाहीसाठी हा विषय महासभेत मांडण्यात येणार आहे.

# कर्जत पालिका विषय समिती सभापती निवड

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषदेच्या विषय समित्यांची सोमवारी (१४ फेब्रुवारी) निवड करण्यात आली आहे. या चारही समित्यांवर शिवसेना-भाजप-आरपीआय महायुतीचे सभापती विराजमान झाले आहेत, चारही सभापती बिनविरोध विराजमान झाल्याने महायुतीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

नगरपरिषदेच्या सभागृहात विषय समित्यांच्या निवडीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. निवडणूक कामकाज कामी सहाय्यक पीठासीन अधिकारी



मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी सहकार्य केले.

नगरपरिषदेमध्ये १८ नगरसेवक आहेत, त्यापैकी १० नगरसेवक शिवसेना-भाजपा-आरपीआय महायुतीकडे आहेत तर ८ नगरसेवक राष्ट्रवादी-मनसे-स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी-शिवराय भिमराय क्रांती संघटना या महाआघाडीचे आहेत.

**विषय समिती सभापती. आरोग्य समिती सभापती** उपनगराध्यक्ष-अशोक ओसवाल, सदस्य-बळवंत घुमरे, विवेक दांडेकर, शरद लाड, ज्योती मेंगाळ. **पाणीपुरवठा सभापती**-प्राची डेरवणकर, सदस्य-विवेक दांडेकर, वैशाली मोरे, पुष्पा दगडे, मधुरा चंदन(पाटील). **बांधकाम सभापती** - राहुल डाळींबकर, सदस्य-नितिन सावंत, संचिता पाटील, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे. **महिला व बालकल्याण सभापती**-विशाखा जिनगरे, उपसभापती-संचिता पाटील सदस्य- स्वामिनी मांजरे, सुवर्णा निलधे, भारती पालकर. **स्थायी सभापती**- अध्यक्ष सुवर्णा जोशी, सदस्य- अशोक ओसवाल, प्राची डेरवणकर, राहुल डाळींबकर, विशाखा जिनगरे.

# जे. एस. एम. कॉलेजमध्ये आग प्रतिबंध संरक्षण प्रशिक्षण

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

'आपत्ती व्यवस्थापन व नियोजानांतर्गत (डिझास्टर मॅनेजमेंट प्लॅन) अलिबाग येथील जे. एस. एम. कॉलेज मध्ये आग प्रतिबंध-संरक्षण' प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रयोगशाळा, ग्रंथालय अथवा अन्य कामाचे ठिकाणी अचानक आग लागल्यास तत्काळ आग विझवण्यासाठी व आपले संरक्षण करण्यासाठी तसेच मालमत्तेचे नुकसान टाळण्यासाठी काय करावे लागेल यांचे प्रशिक्षण या वेळी देण्यात आले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, ॲड. गौतम पाटील या वेळी उपस्थित होते. किमान फायर एक्सिंटगविशर वापरून सर्वांना



आगीवर प्राथमिक नियंत्रण मिळण्याचे प्रशिक्षण आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले. महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, एन. एस. एस. चे स्वयंसेवक, एन.सी.सी. छात्र, विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील, डॉ. एन. एन. शेरे, मिलींद पाटील, प्रा. अ. व्ही. जाधव, एन. एस. एस. प्रा. पी. बी. गायकवाड, प्रा. सुनील आनंद, डॉ. मोहसिन खान यावेळी उपस्थित होते.

'गॅलक्सी फायर अँड सेफ्टी सर्व्हिसेस', अलिबाग यांचेतर्फे हे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. शारदा धुळप, राजन म्हात्रे व डॉ. मोहसिन खान यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

# प्रा.शिक्षक पतपेढीत लवकरच आरटीजीएस, एनइएफटी सुविधा

। अलिबाग ।विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतपेढीचा कारभार यापुढे संगणकावर चालणार आहे. सर्व शाखा आता संगणकीकृत झाल्या आहेत. पुढील काही दिवसात पतपेढीत आरटीजीएस व एनइएफटी अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील अशी घोषणा पतसंस्थेचे अध्यक्ष राजेश सुर्वे यांनी दिली.

पतपेढीच्या अलिबाग, महाड, माणगाव या शाखेच्या सभासदांचा मेळावा नुकताच महाड येथे पार पडला. यावेळी अध्यक्ष सुर्वे यांनी पतसंस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला. पतसंस्थेत आता ऑनलाइन सुविधा दिल्या जाणार आहेत. कारभार पेपरलेस करण्याचा आमचा प्रयत्न



आहे. आरटीजीएस किंवा एनइएफटी सारख्या सुविधांमुळे सभासदांचा वेळ पैसा यांची बचत होईल शिवाय जिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना याचा लाभ मिळणार आहे.

पतसंस्थेने यंदा ९७ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सभासदांना २५ लाख रूपयांपर्यंत कर्ज दिले जाते. मृत्यूफंड योजना हे खास वैशिष्ट्य आहे. सभासदाच्या वारसाला मयत झाल्यास १० लाखांची मदत केली जाते. दुर्धर आजारासाठी १५ हजार रूपये विनापरतावा दिले जातात. सभासदांना १० ते १२ टक्के पर्यंत लाभांश दिला जात असून, कायम ऑडीट 'अ' वर्ग मिळाला आहे. सभासद कर्जदार यांचा व्यक्तीगत विमा व असा एकत्रित करून आजपर्यंत ९३ लाखापर्यंत मृत्यूफंड पोहोचल्याचे सांगितले. त्याचबरोबर भारतीय जीवन विमा सोबत करार करून संस्थेच्या सभासदांना व्यक्तीगत विमा संस्थेने चालू केला असल्याचे सुर्वे यांनी सांगितले. आगामी काळात मृत्यु फंडाची रक्कम वाढवण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न लता मंगेशकर, अभिनेते रमेश देव व ज्ञात-अज्ञात मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्व मान्यवरांचे उपस्थित सभासदांच्या वतीने स्वागत करण्यात आले. संस्थेच्या ठेवीदार म्हणून माया कुचेकर, बळीराम साळवी, तसेच महाड व माणगाव तालुक्यातील सर्व शिक्षक बंधूंना विपष्नेचे प्रशिक्षण दिल्याबद्दल मनीषा लावरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सभासदांना संगणकीकृत पासबुकचे वितरण करण्यात आले. पूजा शहा, दिनेश गावंड, मनीषा लावरे, माया कुचेकर, किसनदेव यमगर, प्रशांत तुळसुळकर, स्मिता नवघरे, श्याम आवळे, प्रदीप शिंदे, बळीराम साळवी आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ अलिबागमधील ऑफिसकरिता आर्किटेक्ट, इंटिरियर डिझायनर आणि ड्राफ्ट्समन पाहिजे. मोबाईल नंबर- ८००७४५२१४६

■ ॲडव्हान्स लेव्हल शेअर मार्केट कोर्स,Investomax कामत आळी, अलिबाग- ७७४४०८८४०४

जाहिरातीसाठी संपर्क

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# पनवेलमधील शिवकालीन तोफांचे जतन

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल महानगरपालिका कार्यालयाच्या आवारात आठ शिवकालीन तोफा असून, त्यांचे रासायनिक संवर्धनाचे कार्य पनवेल महानगरपालिकेच्यावतीनेकरण्यातयेत आहे. या तोफांचे योग्य त्या अभ्यासाने व शास्त्र शुद्ध पद्धतीने संवर्धन व्हावे यासाठी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ यांची इच्छा होती. अनेक दिवस या ऐतिहासिक तोफा परिसरात चंदेरी रंग लावून पालिकेच्या आवारातील चौथऱ्यावर ठेवण्यात आलेल्या आहेत. तरी यांचे योग्य जतन होण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेने या पद्धतीचे पहिल्यांदाच पाऊल टाकले आहे.



या तोफांचे रासायनिक संवर्धनाचे व जतनाचे काम पनवेलमधील श्री शिव सह्याद्री संस्थेने घेतले असून, हे काम रासायनिक संवर्धक पुरातत्व अभ्यासक सागर मुंढे, भाग्यश्री परदेशी, मधुरा गवाणकर, अंकिता परब, रोहन सरपोतदार व त्यांचे साथीदार हनुमान वायभासे, तेजस मोरे, विशाल धाईजे, संदेश म्हात्रे हे करत आहेत.

रासायनिक संवर्धनाच्या माध्यमातून या तोफांचे पुढील अनेक वर्षे जतन होण्यास मदत होणार आहे. तोफांचा रंग व खोलवर बसलेला गंज काढून काही प्रयोग शाळेतील सूत्रांच्या आधारे निर्माण केलेल्या रसायनांचा वापर करून या तोफा जतन केल्या जाणार आहेत. या ऐतिहासिक तोफांचे अशा पद्धतीचे कार्य पनवेल तालुक्यात पहिल्यांदा होत आहे. त्याबद्दल पनवेल मधील अनेक अभ्यासू तथा इतिहासाबद्दल कुतूहल असलेले नागरिक हे काम पाहण्यासाठी भेट देत आहेत.

हे काम पुढील काही दिवस चालेल. या तोफा पनवेल बंदरातील शिवकालीन धक्क्यावर आढळून आल्या होत्या. त्या २०१०-११ साली पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सागर मुंढे व सहकारी मंडळींनी काढून पनवेल महानगरपालिकाच्या आवारात सुखरूप ठेवलेल्या होत्या.

# धुक्यामुळे चालक त्रास्त

। सुतारवाडी । वार्ताहर ।

गेल्या दोन महिन्यांपासून अंगात हुडहुडी भरेल एवढी थंडी जाणवत होती. शेकोटी शिवाय पर्याय नव्हता. या मौसमात स्वेटरची मोठ्या प्रमाणापूर विक्री झाली. गेल्या आठवड्यापासून थंडी कमी होऊ लागली आहे. परंतु धुक्याची तीव्रता तशीच जाणवत आहे. कालवा किंवा छोटी नदी वाहत आहे. अशा परिसरात मोठ्या प्रमाणावर सकाळी धुके पसरलेले दिसत आहे. या धुक्यामुळे वाहन चालकांना पुढचे दिसणे अशक्य झाल्याने वाहनांचा वेग अगदी कमी ठेवावा लागत आहे.

# व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी 'रोटी डे'

## युवा अस्मिता संस्थेचा अन्नदानातून मानवतेचा संदेश

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

युवा अस्मिता संस्थेच्या तरुणांनी व्हॅलेंटाईन डे च्या दिवशी रोटी डे हा उपक्रम राबवित, अन्नदानातून मानवतेचा संदेश दिला आहे. त्यांच्या या अभिनव उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

१४ फेब्रुवारी व्हॅलेंटाईन डे म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. यादिवशी प्रेमीयुगुल समुद्र किनारे, पर्यटन स्थळे, कॉलेज, कॉफी कट्टे, याठिकाणी हा स्पेशल दिवस साजरा करतात. मात्र युवा अस्मिता संस्थेच्या पुढाकाराने कुणाल चव्हाण यांच्या माध्यमातून व्हॅलेंटाईन डे रोटी डे म्हणून साजरा करण्यात आला.

या दिवशी गोरगरिब गरजूंच्या मुखात दोन घास घालून मानवतेचा संदेश देऊन हा दिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी युवा अस्मिता संस्थेचे संस्थापक कुणाल चव्हाण, संस्थेचे रायगड जिल्हा अध्यक्ष राज पाटील, रवींद्र चव्हाण, कुमुदिनी चव्हाण, सिद्धेश जगताप, अभिषेक शिंदे,सारा, कलावती दाबेकर, विशाल पेडामकर, ओंकार माळी, आदींसह पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

कुणाल चव्हाण याने सांगितले की, व्हॅलेन्टाइन डे च्या दिवशी अनेकजण आपल्या प्रियकर व प्रेयसीला सोबत घेऊन हा प्रेम दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र युवा अस्मिता फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही या दिवशी रोटी डे या संकल्पनेखाली अनोखा उपक्रम राबवित आहोत, यामध्ये गोरगरीब , गरजू लोकांना पोटभर जेवण देणे हा आमचा उद्देश आहे. त्यांच्या चेहऱ्यावर हसू व आनंद आणणे यातच आम्हाला खूप समाधान लाभते, आम्हाला वाटते की या दिवशी भारत देशातील एक ही माणूस उपाशी राहू नये, यांना प्रेमाचे पोटभर जेवण मिळाले पाहिजे. ही आमची या रोटी डे उपक्रमाची भावना आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - **मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. भगवान मारूती भोईर | १३ | ००-८१-२० | ८-४४ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-12

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. श्री.भगवान मारूती भोईर<br>२. श्री.संजेश देवीचंद जैन | ११ | ३ | ००-१९-२० | १-१२ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-8

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. श्री.भगवान मारूती भोईर<br>२. श्री.संजेश देवीचंद जैन | ११ | २ | ००-२८-६० | १-६३ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-7

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. जनार्दन दामू घरत | ८ | १ | ००-७३-८० | १२-२६ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-6

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. अनिरूद्ध अनंत खडे | ७ | १ | ००-२६-८० | ४-२५ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-5

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे बिड बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| श्री. अनंता भाऊ लोभी | ४ | १ब | ००-६९-७० | ४-६४ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-2

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री.सदीप अनंत भोईर<br>२.श्री.संतोष गोविंद निलधे<br>३.श्री.संजेश देवीचंद जैन | १२ | ३ | ००-३१-६० | २-५६ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-11

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री.घनश्याम पुनमभाई पटेल<br>२.श्री.संजेश देवीचंद जैन<br>३.श्री.संतोष गोविंद निलधे<br>४.श्री.सदीप अनंत भोईर | १२ | २ | ००-११-४० | ०-७२ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-10

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. श्री. अशोक गोपाळ घरत | १२ | १ब | ए.क्षेत्र००-९३-०० पैकी ००-१७-०० | २-०० |
| २. श्री.संजेश देवीचंद जैन | १२ | १ब | ए.क्षेत्र००-९३-०० पैकी ००-४०-०० | ४-७१ |
| ३. श्री.संदीप अनंत भोईर | १२ | १ब | ए.क्षेत्र००-९३-०० पैकी ००-१७-०० | ४-२३ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-9

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे बिड बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री. संदिप अनंत भोईर<br>२.श्रीमती प्रेरणा प्रकाश वर्तक<br>३.श्री.विनायक किसन लाड<br>४.श्री.विकास किसल लाड<br>५.श्री.विलास किसन लाड<br>६.श्रीमती वनिता किसन लाड | ६ | ३ | ००-३४-६० | ६-१२ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-4

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे बिड बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री. रघुनाथ शिवा रूठे<br>२.श्रीमती तुळसाबाई शिवा रूठे<br>३.श्रीमती सुमन गणपत विरले<br>४.श्रीमती गुलाब महादु टेंबे<br>५.श्रीमती सुगंधा शिवा रूठे | ६ | १ | ००-२६-८० | ३-५० |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-3

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे बिड बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. श्री.सुदामा मारूती घरत<br>२. श्री.संदीप मारूती घरत | ४ | १अ | ००-४६-०० | ४-५१ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-1

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे बिड बुद्रुक ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालकांकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| जमिन मालकांची नावे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १.श्री.संजेश देवीचंद जैन<br>२.श्री.संदीप अनंत भोईर<br>३.श्री.घनश्याम पुनमभाई पटेल<br>४.श्री.संतोष गोविंद निलधे | १४ | ५ | ००-२१-२० | १-७५ |

सबब, सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह दाखल करावी. वरील प्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे, असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२

R-13

**ऑड.सौ. मयुरा दिपक बोटुंगले**
**मो.न.:८८८४००२८२**

**ऑड. श्री. दिपक गोविंद बोटुंगले**
**शॉप क्र.४, जानकी निवास,**
**पिंटोगॅसच्या समोर, विठ्ठलनगर,**
**ता. कर्जत, जि. रायगड.**

### शुध्दीपत्रक

दि.१५/०२/२०२२ रोजी पान क्र.२ वर अॅड.जितेंद्र लेले यांची चौकशी अर्ज क्र.१०१/२०२१ ही नोटीस प्रसिद्ध झाली. त्यामध्ये नजरचुकीने आकार ७.२१ असे छापण्यात आले. तरी ते तसे न वाचता ०.२१ असे वाचण्यात यावे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत हि या मिळकती समोर लिहिलेल्या कब्जेदारांकडून आमचे आशिल श्री परशुराम दिनकर पाटील, रा.हमरापूर वाडा, पो. हमरापूर, ता.पेण, जि.रायगड यांनी कायम खरेदी घेण्याबाबत करार केलेला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उताऱ्या प्रमाणे वर्णन खालील प्रमाणे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे: निधवली, ता. पेण , जि. रायगड.**

| जमीन मालकाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | पो.ख | ए.क्षेत्रफळ हे.आर.पो. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मुक्ताबाई मायजी पाटील | ५७/१/ब | ०.५००० | ४.३५.५९ | ५.०० |

तरी वरील मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अॅटेचमेंट, लीन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध,असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती या बोजाविरहित आहेत असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. व त्या लाभात माझ्या अशिलांसाठी सोडून दिलेल्या आहेत असे समजण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

पेण.
दि.१६/०२/२०२२

**अॅड.नितीन हरिश्चंद्र पाटील**
पाटील वाडा, महावीर मार्ग,
ता.पेण, जि.रायगड.

### जाहीर समन्स

**दावा क्र.२९**
जा.क्र.१२७३ कलम १०१/नोटीस/२०२२
दिनांकः १०/०२/२०२२

मे.असिस्टंट रजिस्टार, सहकारी संस्था
यांचे कार्यालय, ब्राम्हण आळी,राममंदिर हॉल
दुसरा मजला अलिबाग जि.रायगड
प्रति,
१.मे.मॅनेजर
जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग — अर्जदार
१.श्री.वसंत सदानंद गावडे
मु.तळवडे पो.कामार्ले
ता.अलिबाग. जि.रायगड
२.श्री.जयवंत विठ्ठल पाटील — जाब देणार
मु.परहुरपाडा पो.कामार्ले
ता.अलिबाग जि.रायगड
३.श्री.सुमेश सखाराम धसाडे
मु.परहुरपाडा, पो.कामार्ले
ता.अलिबाग,जि.रायगड
महोदय,
तुम्हास नोटीस देण्यात येते की,
१)जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग, यांनी दि.१८/१०/२०२१ रोजी तुमचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणेबाबत रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केला आहे. आणि
२)ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्ही सर्व जाब देणार यांचे विरूध्द रक्कम रू.७९,८७९/- बाबत वसुलीचा दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे.
३)ज्या अर्थी तुम्हांस नोटीस देण्यात येते की, दिनांक २५/०२/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता स्वतः हजर रहावे व अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करावे.
४)तुम्हास अशी नोटीस देण्यात येते की, सदर अर्जाबाबत सदर दिवशी पूर्ण चौकशी करण्यात येईल व सदर अर्जाचा निष्कर्षही करण्यात येईल.
५)या कामी तुम्ही गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येईल व योग्य तो निर्णय केला जाईल.
ही नोटीस आज दि.१०/०२/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**
**अलिबाग-रायगड**

### जाहीर नोटीस

अर्जदार तर्फे ॲड.ए.ए.हुसेन

**मुरूड येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे कोर्टात**

क्रि.चौ.अर्ज १०/२०२२

मोहतसीम कमालुद्दीन कोकाटे — अर्जदार
विरूध्द
सरकारतर्फे
नगरपरिषद मुरूड, — सामनेवाला
ता.मुरूड, जि.रायगड

सर्व लोकांस कळविण्यात येते की,

यातील अर्जदार याची बहीण मक्बूला कमालुद्दीन कोकाटे, हिचा जन्म दिनांक १५/०६/१९६९ रोजी मौजे-दरबार रोड, ता.मुरूड येथे झाला असल्याची जन्माची नोंद होण्याकरीता आदेश मिळवण्यासाठी मे कोर्टाकडे अर्ज केलेला आहे. तरी सदर आदेश देणेस कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २२/३/२२ पर्यन्त मे न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी.

आज तारीख १४/२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक**
**दि.न्या.क.स्तर मुरूड**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर मुरूड**

### जाहीर समन्स

**दावा क्र.३५**
जा.क्र.१२७३ कलम १०१/नोटीस/२०२२
दिनांकः १०/०२/२०२२

मे.असिस्टंट रजिस्टार, सहकारी संस्था
यांचे कार्यालय, ब्राम्हण आळी, राममंदिर हॉल
दुसरा मजला अलिबाग जि.रायगड
प्रति,
१.मे.मॅनेजर
जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग — अर्जदार
१.श्री.मंदा पांडुरंग पाटील/श्री.रामचंद्र नागु म्हात्रे
मु.चेंढरे श्रीगणेश को.ऑप.हौ.सोसायटी
पो.ता.अलिबाग. जि.रायगड
२.श्री.दत्तात्रेय रामा म्हात्रे
मु.वृंदावन सोसायटी ५११ गोंधळपाडा पो.वेश्वी ता.अलिबाग जि.रायगड
३.श्री.विशाल धर्मा पाटील — जाब देणार
मु.दिवी पारंगी पो.चिंचोटी, ता.अलिबाग, जि.रायगड
४.श्री.दिगंबर लक्ष्मण पुनकर
मु.भिलजी बोरघर पो.बाफळे ता.अलिबाग जि.रायगड
५.सौ.रूपाली रामचंद्र म्हात्रे
मु.चेंढरे श्रीगणेश को.ऑप.हौ.सोसायटी पो.ता.अलिबाग,जि.रायगड
महोदय,
तुम्हास नोटीस देण्यात येते की,
१)जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग, यांनी दि.२८/१०/२०२१ रोजी तुमचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणेबाबत रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केला आहे. आणि
२)ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्ही सर्व जाब देणार यांचे विरूध्द रक्कम रू.३६,६०,४६६/- बाबत वसुलीचा दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे.
३)ज्या अर्थी तुम्हांस नोटीस देण्यात येते की, दिनांक २५/०२/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता स्वतः हजर रहावे व अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करावे.
४)तुम्हास अशी नोटीस देण्यात येते की, सदर अर्जाबाबत सदर दिवशी पूर्ण चौकशी करण्यात येईल व सदर अर्जाचा निष्कर्षही करण्यात येईल.
५) या कामी तुम्ही गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येईल व योग्य तो निर्णय केला जाईल.
ही नोटीस आज दि.१०/०२/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**
**अलिबाग-रायगड**

### जाहीर समन्स

**दावा क्र.३६**
जा.क्र.१२७३ कलम १०१/नोटीस/२०२२
दिनांक : १०/०२/२०२२

मे.असिस्टंट रजिस्टार, सहकारी संस्था
यांचे कार्यालय, ब्राम्हण आळी, राममंदिर हॉल
दुसरा मजला अलिबाग जि.रायगड
प्रति,
१.मे.मॅनेजर
जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग — अर्जदार
१.श्री.सोनाली पांडुरंग पाटील/सौ.रूपाली रामचंद्र म्हात्रे
मु.चेंढरे श्रीगणेश को.ऑप.हौ.सोसायटी
पो.ता.अलिबाग. जि.रायगड — जाब देणार
२.श्री.दत्तात्रेय रामा म्हात्रे
मु.वृंदावन सोसायटी ५११ गोंधळपाडा पो.वेश्वी ता.अलिबाग जि.रायगड
३.श्री.विशाल धर्मा पाटील
मु.दिवी पारंगी पो.चिंचोटी, ता.अलिबाग, जि.रायगड
४.श्री.उमेश रामचंद्र जाधव
मु.पळी पो.पोयनाड, ता.अलिबाग जि.रायगड
५.श्री.रामचंद्र नागु म्हात्रे
मु.चेंढरे श्रीगणेश को.ऑप.हौ.सोसायटी पो.ता.अलिबाग,जि.रायगड
महोदय,
तुम्हास नोटीस देण्यात येते की,
१)जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग, यांनी दि.२८/१०/२०२१ रोजी तुमचे विरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम १०१ प्रमाणे वसुलीचा दाखला मिळणेबाबत रितसर अर्ज या कार्यालयाकडे दाखल केला आहे. आणि
२)ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्ही सर्व जाब देणार यांचे विरूध्द रक्कम रू.३६,६०,४६६/- बाबत वसुलीचा दाखला मिळावा म्हणून विनंती केली आहे.
३)ज्या अर्थी तुम्हांस नोटीस देण्यात येते की, दिनांक २५/०२/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता स्वतः हजर रहावे व अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करावे.
४)तुम्हास अशी नोटीस देण्यात येते की, सदर अर्जाबाबत सदर दिवशी पूर्ण चौकशी करण्यात येईल व सदर अर्जाचा निष्कर्षही करण्यात येईल.
५)या कामी तुम्ही गैरहजर राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येईल व योग्य तो निर्णय केला जाईल.
ही नोटीस आज दि.१०/०२/२०२२ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**
**अलिबाग-रायगड**

## १४ वर्षांखालील मुलांची क्रिकेट स्पर्धा

# रायगड संघाचा सुपर लीगमध्ये प्रवेश

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

नाशिक येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १४ वर्षांखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेत रायगडने गटात अव्वल स्थान मिळवून सुपर लीगमध्ये प्रवेश केला.

या स्पर्धेत रायगडचा शेवटचा साखळी सामना औरंगाबाद विरुद्ध होता. या सामन्याच्या निकालावर सुपर लीगमध्ये प्रवेश कोण करणार हे ठरणार होते. औरंगाबाद विरुद्ध गोल्फ क्लब मैदानावर खेळला गेलेल्या सामन्यात औरंगाबादने पहिल्या डावात २४२ धावा केल्या. रायगडने आपल्या पहिल्या डावात ९ गाडी गमावून २५३ धावा केल्या. पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर विजय मिळवून रायगड संघाने गटात अव्वल स्थान मिळवून सुपर लीगमध्ये प्रवेश केला.

औरंगाबाद संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या संघाने ७१.२ षटकांमध्ये २४२ धावा केल्या. औरंगाबाद संघाचा आरेझ खान याने ८७ चेंडूत ६७ धावा केल्या. रायगडच्या अमय भोसले याने १७.२ षटकांत ६० धावा देऊन पाच बळी घेतले. रायगड संघाची सुरुवात खराब झाली. धावफलक २३ धावात २ बळी असे दर्शवत असताना संघनायक ओम म्हात्रे १३५ चेंडूत ५८ धावा व निर्जल पाटील ८८ चेंडूत ३१ धावा या दोघांनी मिळून तिसऱ्या गड्या करता १६८ चेंडूत ८० धावांची भागीदारी केली. त्यानंतर हे दोघेही फलंदाज पाठोपाठ बाद झाल्याने रायगडचा धावफलक २ बाद १०३ वरून चार बाद १०७ असा झाला. स्मित पाटील व पार्थ पवार यांनी १८३ चेंडूत ८६ धावांची भागीदारी करून पहिल्या डावातील आघाडीचे उद्दिष्ट दृष्टिपथात आणले. यामध्ये पार्थ पवार याने १०१ चेंडूत ३७ धावा केल्या. स्मित पाटील याने उर्वरित फलंदाजांबरोबर ३१ व २७ धावांच्या दोन छोट्या-छोट्या भागीदाऱ्या करून पहिल्या डावात आघाडी प्राप्त केली. स्मित पाटील १३० चेंडूत ८१ धावा काढून नाबाद राहिला. रायगड संघाने ९० षटकात ९ बाद २५३ धावा केल्या व ११ धावांची पहिल्या डावात आघाडी घेतली. अशाप्रकारे रायगड संघाने आपल्या गटामध्ये अव्वल स्थान प्राप्त केले व सुपर लीग स्पर्धे करता देखील पात्रता मिळवून इतिहास घडवला.

हिंगोली, नाशिक, औरंगाबाद विरुद्धच्या सामन्यांमध्ये द्रुतगती गोलंदाज अमेय पाटील १८ बळी साईराज जोशी ९ बळी, फिरकी गोलंदाज शौर्य गायकवाड ७ बळी, अमय भोसले ५ बळी व ओम म्हात्रे चार बळी. फलंदाजांमध्ये क्रिश भाइरा १५१ धावा, स्मित पाटील ११९ धाव, ओम म्हात्रे १०९ धावा, यष्टीरक्षक पार्थ पवार ७० धावा यांनी दमदार कामगिरी केली.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी संघाचे व्यवस्थापक कम प्रशिक्षक जॉन्टी गिलबिले, निवड समिती सदस्य सुमित झुंझारराव, विनेश ठाकूर, अजित म्हात्रे या सर्वांचे विशेष कौतुक केले. तर रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व सभासदांनी रायगड संघाचे अभिनंदन केले आहे. भविष्यात या सर्व मुलांवर लक्ष देण्यात येईल, असे असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी सांगितले.



## केपीएल ठरला 'लालबाग रॉयल्स'चा मानकरी

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील क्रीडा संकुलावर झालेल्या १० व्या केपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत लालबाग रॉयल्सने अर्णव वॉरियर्सचा १चेंडू आणि ६गडी राखून शानदार विजय मिळवून केपीएलच्या चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेचा बक्षीस समारंभ माजी उपनगराध्यक्ष रघुनाथ बोरकर यांच्या हस्ते झाला. यावेळी व्यासपीठावर आकाश ठाकूर, विजय धामणे, गोपाळ गोडिवले, हरिभाऊ पेळणेकर, सुरेश पाटील, बाळा कोंडेकर, मनोज पवार, जितेंद्र शाह, छाया शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

गेले दोन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत उपांत्यफेरीच्या लढतीत अर्णव वॉरियर्सने मुंजोबा भैरीदेवी इलेव्हन्सचा पराभव केला. लालबाग रॉयल्सने याआधीच अंतिम फेरीतील आपले स्थान पक्के केले.

गेली १० वर्षे केपीएल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जात आहे. यावर्षी राहुल बोरकर यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या समालोचनाची जबाबदारी महेश गोडिवले, गणेश चव्हाण, संदीप साळवी यांनी पार पाडली. स्पर्धेचा मालिकावीर अर्णव वॉरियर्सचा विशाल कोंडेकर, स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून संचित चाळके, आणि उत्कृष्ट गोलंदाज ऋषी निकम ठरला अनुक्रमे लालबाग रॉयल्स, अर्णव वॉरियर्स, मुंजोबा भैरीदेवी एलेव्हन्स, कल्पेश जॅग्वार आणि जयमल्हार असे अंतिम पाच संघ होते.

### महत्त्वाचे

## सीएसकेने रैनाला सोडले वाऱ्यावर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

चेन्नई सुपर किंग्जला आपली १२ वर्षे देणाऱ्या सुरेश रैनावर यंदाच्या आयपीएल लिलावात अनसोल्डचा शिक्का बसला. सीएसकेने घरवापसी मोहिमेतून रैनाला वगळले. यावरून सोशल मीडियावर सीएसकेवर चांगलीच टीका होत आहे. सुरेश रैना आणि चेन्नईचा थलायवा एमएस धोनी यांचा याराना तसा बराच पुराना आहे. मात्र कारकिर्दिच्या उतरत्या काळात ही जोडी फुटली. दरम्यान, टीकेचे धनी झालेल्या चेन्नईने सुरेश रैनाला लिलावात लावारिस सोडण्याचे कारण सांगितले.

## आयपीएल लिलावात शाकिबची निराशा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएलच्या लिलावात बांगलादेशचा अनुभवी अष्टपैलू खेळाडू शाकिब अल हसनच्या हाती निराशा आली. बंगळुरुमध्ये पार पडलेल्या दोन दिवसीय आयपीएल लिलावात कोणत्याही संघाने शाकिब अल हसनला विकत घेण्यात रस दाखवला नाही. २ कोटींची मूळ किंमत ठेवलेल्या बांगलादेशाच्या या अष्टपैलू खेळाडूला पुन्हा संघात घेण्यात कोलकाता नाईट रायडर्सही उत्सुक दिसला नाही. ३४ वर्षीय शाकिब अल हसनला कोणत्याही संघाने विकत का घेतलं नाही.

## कबड्डी स्पर्धेत जय बजरंग आंबेवाडी संघ विजेता

**। कोलाड । वार्ताहर ।**

धाकसुद मंडळ चिल्हे ता.रोहा आयोजित कोलाड विभागीय कबड्डी स्पर्धेत जय बजरंग आंबेवाडी संघ अंतिम विजेता ठरला आहे.



रोहा तालुक्यातील धाकसुद चिल्हे युवक मंडळाने आयोजित केलेल्या व कोलाड विभागीय कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने तसेच ग्रामस्थ मंडळ चिल्हे यांच्या विशेष सहकार्यातून आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत अंतिम फेरीची अटीतटीची लढत जय बजरंग आंबेवाडी व गावदेवी बाहे यांच्यात झाली. रसिक प्रेक्षकांना हा सामना अतिशय रंगतदार पहावयास मिळाला. अंतिम लढत मोठी मजेदार व रसिकांना भारावून सोडणारी ठरली. या लढतीत जय बजरंग आंबेवाडी संघ विजेता ठरला तर द्वितीय क्रमांकावर गावदेवी बाहे संघाला समाधान मानावे लागले.

स्पर्धेत अंतिम विजेता आंबेवाडी संघ तर उपविजेता बाहे संघ तसेच तृतीय क्रमांकचे मानकरी सापया वरसगाव व चतुर्थ क्रमांक धाकसूद चिल्हे संघांनी पटकावले आहे. तर स्पर्धेतील मालिकावीर आंबेवाडी संघाचा अखिलेश गाडगे, उत्कृष्ट चढाईपटू बाहे संघाचा विजय माठल, तर उत्कृष्ट पक्कड पुरस्कार वरसगांव संघाचा नितेश सानप हे मानकरी ठरले. विजयी संघाना तसेच खेळाडूंना पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले. आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मंडळाच्यावतीने करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी धाकसुद मंडळ चिल्हेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## साईराम क्रीडा मंडळाच्यावतीने कबड्डी स्पर्धा

**। खेड । प्रतिनिधी ।**

साईराम मित्र मंडळ खेड आयोजित खेड तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने नुकतीच नगरपरिषद खेड येथील मैदानावर तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये एकूण १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुशांत सकपाळ अन्य मान्यवर उपस्थित होते.



या स्पर्धेत भैरवनाथ क्रीडा मंडळ चिंचघर यांनी प्रथम क्रमांक तर काळकाई कला, क्रीडा केंद्र भरणे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून भैरवनाथ क्रीडा मंडळाचा साहिल दळवी तर रत्नाकर पवार यास उत्कृष्ट पकड म्हणून तसेच काळकाई कला क्रीडा केंद्र भरणेच्या शुभम बिर्जे यास उत्कृष्ट चढाई पटू म्हणून आकर्षक ढाल देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेला पंच म्हणून संतोष शिर्के, मधुकर शिंदे, उल्हास शेलार, पुरुषोत्तम पाटील, गणेश सानप, दिनेश पदुमले, परेश खोपडे, शशिकांत भुवड, अजय निगडेकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेदरम्यान खेड तालुका कबड्डी असोसिएशनचे सतीश चिकणे, रवींद्र बैकर, संमद बुरोंडकर, महेश भोसले, दाजी राजगुरू, शरद भोसले, दीपक यादव, दिलीप कारेकर, स्वप्निल सैतवडेकर, संपदा गुजराथी, तुषार सापटे यांचेसह अन्य असोसिशन पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी साईराम क्रीडा मंडळाचे संदेश खेडेकर व सनी देवळेकर यांनी विशेष मेहनत घेतली. प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात ही स्पर्धा कब्बड्डीच्या जोशपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाली.

## जिल्हा युनिफाईट अजिंक्यपद स्पर्धेत

# खांदा कॉलनी शाखेला तृतीय विजेतेपद

**। पनवेल । वार्ताहर ।**

रायगड युनिफाईट असोसिएशनच्या वतीने सेंट अँड्रूज इंटरनॅशनल स्कुल आकुर्ली येथे ९ व्या रायगड जिल्हा युनिफाईट निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाच्या खांदा कॉलनी शाखेने १० सुवर्णपदक ९ रौप्यपदक आणि २ कांस्यपदक मिळवत तृतीय क्रमांक संपादित केला. विजेत्या खेळाडूंची २७ आणि २८ फेब्रुवारी २०२२ रोजी कराड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



यामध्ये आदित्य कापडोस्कर, अथर्व मसुरकर, कादंबरी बोराडे, श्रेया शिंदे, साक्षी केवट, ओम पिसाळ, पंक्ती पाठक, अलोकी पालवे, अनिरुद्ध खरात, विघ्नेश पाठक सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची नावे आहेत. तर विवान कटियार, भार्गव भगत, रिया चव्हाण, हर्षद मेहेत्रे, अक्षयिनी मांजरेकर, श्रुती शिंदे, पिनांक्ती देशमुख, पल्लवी कणसे, शिवम केवट रौप्यपदक विजेत्या खेळाडूंची नावे आहेत. तसेच शर्वरी बनसोडे, स्मित पाटील कांस्यपदक विजेत्या खेळाडूंची नावे आहेत. हे सर्व खेळाडु आगरी शिक्षण संस्था, एड्युकिडझ इंटरनॅशनल खांदा कॉलनी येथे सेन्सेई प्रतिक कारंडे यांच्याकडे कराटे आणि इतर मार्शल आर्टस्चे प्रशिक्षण घेत आहेत. विजेत्या खेळाडुंचे सर्व स्तरावर कौतुक होत आहे तसेच युनायटेड शोतोकान कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र युनिफाईट संघटनेचे सचिव डॉ. मंदार पनवेलकर यांनी खेळाडूंचे विशेष कौतुक करत त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आशिया अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत

# युवा बॅडिमटनपटू कामगिरीसाठी सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया सांघिक अजिंक्यपद बॅडिमटन स्पर्धेला प्रारंभ झाला असून लक्ष्य सेन आणि मालविका बनसोड यांसारखे युवा भारतीय खेळाडूंच्या कामगिरीकडे बॅडमिंटन क्षेत्राचे लक्ष लागले आहे.



भारताच्या अनुभवी खेळाडूंनी या स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या अनुपस्थितीत पुरुष संघाची जागतिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या लक्ष्य सेनवर भिस्त असून किरण जॉर्ज आणि मिथून मंजुनाथ यांची त्याला साथ लाभेल. पुरुष दुहेरीत रवीकृष्ण पीएस-शंकर प्रसाद उदयकुमार आणि मनजित सिंह-डिंकू सिंग कोंथूजाम यांचा चांगल्या कामगिरीचा प्रयत्न असेल. अ-गटात समाविष्ट असलेल्या भारतीय पुरुष संघाचे कोरियाव्यतिरिक्त तीन वेळा विजेत्या इंडोनेशिया आणि हाँगकाँग यांच्याशी सामने होतील. दुसरीकडे सय्यद मोदी स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी मालविका, आकर्षि कश्यप आणि अश्मिता चाहिला यांचा समावेश असलेल्या भारतीय महिला संघाचे मलेशियासह गतविजेत्या जपानशी सामने होणार आहेत. भारतीय महिला संघाला ब-गटातून आगेकूच करण्यासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. प्रत्येक गटातून अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. तसेच या कामगिरीसह हे संघ मे महिन्यात होणाऱ्या थॉमस आणि उबेर चषक स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

## प्रो लीग पुरुष हॉकी स्पर्धा

# भारताकडून दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

टोक्यो ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या भारताने गेल्या आठवड्यात झालेल्या पहिल्या टप्प्यातील लढतीतही आफ्रिकेवर १०-२ असे वर्चस्व गाजवले होते. त्यामुळे दुसऱ्या सामन्यासाठीही भारताचे पारडे जड मानले जात होते. त्यातच शनिवारी फ्रान्सकडून २-५ असा पराभव पत्करल्याने भारतीय हॉकीपटूंवर कामगिरी उंचावण्याचे दडपण होते. जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या भारतासाठी हरमनप्रीतने अनुक्रमे १३, ५२ व्या मिनिटाला पहिले दोन, तर ६० व्या मिनिटात आणखी दोन गोल नोंदवले. शिलानंद लाक्राने (२७ वे, ४८ वे मि.) दोन गोल झळकावत हरमनप्रीतला उत्तम साथ दिली. याव्यतिरिक्त सुरेंदर कुमार (१५ वे मि.), मंदीप सिंग (२८ वे मि.), सुमित (४५ वे मि.) आणि शमशेर सिंग (५६ वे मि.) यांनी प्रत्येकी एक गोल केला. आफ्रिकेकडून डॅनियल बेल (१२ वे मि.) आणि कोनोर ब्यूचॅम्प (५३ वे मि.) यांनी दोन गोल नोंदवले.

या विजयासह भारतीय संघाने गुणतालिकेतील तिसरे स्थान भक्कम केले असून चार सामन्यांनंतर त्यांच्या खात्यात तीन विजयांचे नऊ गुण जमा आहेत. नेदरलँड्स (१६ गुण) आणि बेल्जियम (१० गुण) पहिल्या दोन क्रमांकावर विराजमान आहेत.

## शरीरसौष्ठव स्पर्धेला प्रीतम म्हात्रेंची भेट

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर येथे महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन आयोजित दिव्यांग, मास्टर्स व ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२२ राज्य अजिंक्यपद शरीरसौष्ठव स्पर्धेला विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी भेट दिली व विजेत्या स्पर्धकांना चषक प्रदान करून शुभेच्छा दिल्या.



यावेळी प्रीतम म्हात्रे यांच्यासह इंडियन बॉडीबिल्डर फेडेरेशनचे मधुकर तळवलकर, वर्ल्ड बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे सेक्रेटरी चेतन पाठारे, महाराष्ट्र बॉडीबिल्डींग असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत आपटे, वर्ल्ड बॉडीबिल्डिंग असोसिएशनचे लिगल अॅडव्हायझर विक्रम रोठे, हिरल शहा, महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश सावंत, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि बॉडीबिल्डर सुभाष पुजारी तसेच स्पर्धक व प्रेक्षक उपस्थित होते.

## श्रीवर्धन येथे क्रिकेट सामन्यांचे आयोजन

**श्रीवर्धन :** येथील ७ मित्रांची क्रिकेट क्लब तर्फे र.ना.राऊत हायस्कूल श्रीवर्धन मागील भव्य पटांगण येथे २५ ते २८ फेब्रुवारी अशी ४ दिवसीय ओव्हर आर्म क्रिकेटचे डे सामने आयोजित करण्यात आले आहेत. स्पर्धेत पन्नास हजारांचे प्रथम पारितोषिक तर पंचवीस हजारांचे द्वितीय पारितोषिक तसेच उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, मालिकावीर व सामनावीर असे पारितोषिक ठेवण्यात आले आहेत.

## सोशल मीडियावर हॅशटॅग आणीबाणी कॅनडा ट्रेंड

**वर्षा मेहता**
**। अलिबाग ।**

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी सोमवारी कोविड आरोग्य नियमांविरूद्ध ट्रकरच्या नेतृत्वाखालील निषेध संपवण्यासाठी क्वचितच वापरल्या जाणाऱ्या आणीबाणीचा वापर केला. कॅनडाच्या इतिहासात शांततेच्या काळात अशा शक्तींचा वापर करण्यात आल्याची ही केवळ दुसरीच वेळ आहे.



फेडरल सरकारने नाकेबंदी आणि व्यवसायांना संबोधित करण्यासाठी प्रांतीय आणि प्रादेशिक क्षमतेला पूरक म्हणून आपत्कालीन कायदा लागू केला आहे, ट्रूडो यांनी एका पत्रकार परिषदेत सांगितले. हिंसाचाराचा धोका कायम होताच, फेडरल पोलिसांनी सांगितले की त्यांनी ११ आंदोलकांना रायफल, हँडगन, शरीर चिलखत आणि दारुगोळ्यासह कौट्स, अल्बर्टा आणि स्वीट ग्रास, मोंटाना यांच्या सीमेवर अटक केली.

SOCIAL MEDIA पडसाद

अनेकांनी सोशल मीडियावर या आणीबाणीचा विरोध केला. नेटिझन्सनी मत व्यक्त केले कि कॅनडा हुकूमशाहीकडे वळत आहे जे जगाच्या लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायकच आहे. सोशल मीडियावर आणीबाणीचा निषेध करण्यात आला.

ट्रूडो म्हणाले की या टप्प्यावर सैन्य तैनात केले जाणार नाही, परंतु अधिकाऱ्यांना निदर्शकांना अटक करण्यासाठी आणि नाकेबंदी साफ करण्यासाठी तसेच निषेध निधीवर बंदी घालण्यासाठी त्यांचे ट्रक जप्त करण्याचे अधिक अधिकार दिले जातील.

# टीम इंडिया-विंडीज टी -२० मालिका आजपासून

## स्टार ऑलराऊंडर मालिकेतून बाहेर

**। मुंबई । प्रतिनिधी।**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील १६ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या टी-२० मालिकेपूर्वी भारतीय संघाचा ऑलराऊंडर वॉशिंग्टन सुंदर दुखापतग्रस्त होऊन संपूर्ण मालिकेतून बाहेर झाला आहे.

सुंदरला मालिकेपूर्वी दुखापत झाली असून यापुढे तो या मालिकेचा नसणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुंदर कोलकाता येथे उपस्थित असलेल्या भारतीय संघापासून वेगळा झाला आहे आणि आता तो थेट राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये जाईल, जिथे त्याच्या दुखापतीची काळजी घेत उपचार केले जातील. सुंदरने नुकतेच एकदिवसीय मालिकेतूनच संघात पुनरागमन केले होते. वृत्तसंस्था पीटीआयने बीसीसीआयच्या अधिकाऱ्याच्या हवाल्याने म्हटले आहे की, सुंदरला हॅमस्ट्रिंगची समस्या आहे, त्यामुळे तो या मालिकेत खेळण्याची शक्यता नाही. अधिकाऱ्याने सांगितले की, वॉशिंग्टनला दुखापत झाली आहे, त्यामुळे तो आज सराव करू शकला नाही. ५ दिवसांत ३ सामने खेळवले जाणार असल्याने तो संपूर्ण टी-२० मालिकेतून बाहेर पडण्याची शक्यता आहे.




सुंदरने वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे मालिकेतूनच टीम इंडियात पुनरागमन केले. गतवर्षी इंग्लंड दौऱ्यावर दुखापत झाल्याने तो कसोटी मालिकेत खेळला नव्हता. यानंतर तो आयपीएल २०२१ आणि टी-२० वर्ल्ड कपही खेळू शकला नाही. दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर एकदिवसीय मालिकेसाठी सुंदरची निवड करण्यात आली होती, परंतु रवाना होण्यापूर्वी त्याला कोरोना संसर्ग झाला आणि त्यामुळे तो बाहेर आला. टी-२० मालिकेसाठी टीम इंडियाकडे आता फक्त लेग-स्पिनर युजवेंद्र चहल हा अनुभवी फिरकी गोलंदाज आहे. संघात रवी बिश्नोईचाही समावेश असला तरी हरप्रीत ब्रारही स्टँडबाय म्हणून संघासोबत कोलकाता येथे पोहोचला आहे. अशा परिस्थितीत सुंदरच्या जागी याचा संघात समावेश होतो की नाही हे पाहावे लागेल.

### तिसरा खेळाडू बाहेर

**सुंदर आता थेट बेंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत जाईल, जिथे तो त्याच्या दुखापतीवर उपचार करेल. भारताचा धाकड खेळाडू आणि अक्षर पटेल याआधीच सिरीजमधून बाहेर गेले आहेत. राहुल आणि अक्षर देखील टी-२० मालिकेचा भाग होते, परंतु दोघांनाही वेगवेगळ्या कारणांमुळे वगळण्यात आले. दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात क्षेत्ररक्षणादरम्यान राहुलला दुखापत झाली आहे, त्यामुळे तो तिसऱ्या वनडेत खेळू शकला नाही. त्याचवेळी, अक्षर पटेलला वनडे मालिकेपूर्वीच कोरोनाची लागण झाली होती.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)